भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२५८ ■ रविवार २१ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.No./DHL/53/24-26

उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांडाच्या आरोपातुन मा.मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व निर्दोष





**मुंबई, दि. २० : तब्बल दोन दशकांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात आणि न्यायव्यवस्थेत चर्चेचा विषय ठरलेल्या पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा आज निर्णायक शेवट झाला. सीबीआय विशेष न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आठ आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.या खटल्यात न्यायालयाने डॉ. पद्मसिंह पाटील, सतीश मंदाडे, मोहन शुक्ला, शशिकांत कुलकर्णी, कैलास यादव, दिनेश तिवारी, पिंटू सिंग आणि छोटे पांडे या सर्व आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त केले. निकालामुळे या घटनेला अनपेक्षित कलाटणी मिळाली आहे. न्यायमूर्ती एस. आर. नावंदर यांनी दिलेल्या या निकालामुळे निंबाळकर कुटुंबाला मोठा धक्का बसला असून, राज्यातील राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे.**

**वीस वर्षांच्या लढाईचा शेवट**

मुंबईतील सीबीआय विशेष न्यायालयात शनिवारी हा बहुप्रतीक्षित निकाल जाहीर करण्यात आला. निकालाच्या दिवशी न्यायालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बिहारच्या तुरुंगातून आणण्यात आलेला मुख्य आरोपी आणि कथित शूटर पिंटू सिंग याला उशिरा न्यायालयात हजर करण्यात आल्याने काही काळ उत्सुकता आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, त्याच्या उपस्थितीपूर्वीच न्यायालयाने निकाल वाचनास सुरुवात केली. निकाल जाहीर करताना न्यायमूर्ती नावंदर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, न्यायालय भावना किंवा संशयाच्या आधारावर नव्हे, तर केवळ कायदेशीरदृष्ट्या सिद्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे निर्णय देते. एका लोकनेत्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या होणे ही अत्यंत दुर्दैवी घटना असली, तरी दोष सिद्ध करण्यासाठी ठोस आणि निर्विवाद पुरावे आवश्यक असतात, असे त्यांनी नमूद केले.

**माफीच्या साक्षीदाराची साक्ष अविश्वसनीय**

या खटल्यातील सर्वात महत्त्वाचा आधार माफीचा साक्षीदार पारसमल जैन याची साक्ष होती. मात्र, न्यायालयाने ही साक्षच (पान ८ वर)

### धुळे जि.क्रिकेट असो.गोलंदाज

## देवराज बडगुजर महाराष्ट्राच्या संघात



शिरपूर, दि.२०- भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आयोजित राष्ट्रीय पातळीवरील सैय्यद मुश्ताक अली टी - २० ट्रॉफी स्पर्धेसाठी संभाव्य महाराष्ट्र संघात धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा तेज गोलंदाज देवराज बडगुजर याची निवड करण्यात आली आहे.

दि. २० जून पासून पुणे येथे अंतिम संघासाठी निवड सामने आयोजित करण्यात आले असून देवराज त्यासाठी रवाना झाला आहे. नुकतीच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन तर्फे महा टी - २० आमंत्रित स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, त्यात देवराज याने धुळे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत ५ सामन्यात ११ महत्वपूर्ण बळी बाद (पान ८ वर)

## प्रकाशाजवळ नव्वद लाखांचा मद्यसाठा जप्त शहादा पोलिसांनी सापळा रचून ट्रक पकडला



**शहादा, दि.२०(का.प्र.)- मध्य प्रदेश मार्गे हरियाणातून गुजरात राज्याकडे विदेशी दारूची मोठी खेप घेऊन जाणारा दहा चाकी कंटेनर शहादा पोलिसांनी शिताफीने पकडला आहे. शहादा पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील आणि गुन्हे शोध पथकाने प्रकाशा गावाजवळ सापळा रचून ही धडक कारवाई केली. या कारवाईत ६५ लाख २९ हजार २०० रुपये किमतीचा विदेशी दारूचा साठा आणि २५ लाख रुपये किमतीचा कंटेनर असा एकूण ९० लाख २९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दारू तस्करांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे.**

पोलीसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, हरियाणा राज्यातून विदेशी दारूने भरलेला एक दहा चाकी कंटेनर शहादा-प्रकाशा मार्गे गुजरातच्या दिशेने जाणार होता. या माहितीच्या आधारे शहादा डीबी पथकाने शुक्रवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास प्रकाशा परिसरातील वैजाली रस्त्यावरून येणाऱ्या अशोक लेलँड कंटेनर क्रमांक आर.जी.३२, जी.सी.०८१२ ला अडवले. पोलिसांनी चालकाकडे चौकशी केली असता, त्याने कंटेनरमध्ये घरगुती सामान असल्याचा बनाव केला. मात्र, त्याचा संशयास्पद वावर पाहून पोलिसांनी गाडी उघडण्यास सांगताच चालक व वाहक घाबरले आणि त्यांनी गाडीत अवैध दारू असल्याचे कबूल केले. त्यानंतर पथकाने सदर वाहन शहादा पोलीस ठाण्यात आणले.रात्री उशिरा कंटेनरमधील बॉक्स खाली उतरवून तपासणी केली असता, त्यात नामांकित कंपन्यांच्या विदेशी दारूचा मोठा साठा आढळून आला. सदर वाहन व मुद्देमाल जप्त करून चालक आणि वाहकाला पोलिसांनी ताब्यात (पान ८ वर)

## बीज वाटपातील गैरसोयींमुळे शेतकरी त्रस्त पिंपळनेरला वितरण केंद्र सुरू करा; मागणी

साक्री, दि.२०(प्रतिनिधी) - राज्य शासनाच्या बीज वाटप योजनेअंतर्गत साक्री तालुक्यात सुरू असलेल्या सोयाबीन बियाणे वितरण प्रक्रियेत अनेक गैरसोयी निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर पिंपळनेर येथे स्वतंत्र बीज वितरण केंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हर्षल बिरारी यांनी तालुका कृषी अधिकारी योगेश सोनवणे यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना



मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप केले जात आहे. मात्र संपूर्ण तालुक्यासाठी साक्री येथेच एकमेव वितरण केंद्र ठेवण्यात आल्याने दूरवरच्या भागातील शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. साक्री तालुक्याचा भौगोलिक विस्तार मोठा असून चरणमाळसारख्या दुर्गम भागातून साक्री येथे पोहोचण्यासाठी तब्बल ५५ ते ६० किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्ची पडत आहेत.

शासनाकडून मोफत मिळणारे बियाणे घेण्यासाठीही शेतकऱ्यांना प्रवासासाठी व बियाणे वाहतुकीसाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. याशिवाय बियाण्यांच्या पॅकिंगबाबतही गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ किलो बियाणे मंजूर असताना वितरणासाठी ३० किलोच्या पिशव्यांचा वापर करण्यात येत आहे. (पान २ वर)

## गणपतीपुळे समुद्रात आठ जण बुडालेत

रत्नागिरी, दि. २० : रत्नागिरीतील प्रसिद्ध गणपतीपुळे येथे धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. गणपतीपुळे येथे समुद्रात उतरलेले छत्रपती संभाजीनगरमधील आठ पर्यटक समुद्राच्या पाण्याचा अंदाज न आल्यामुळे बुडाल्याची घटना घडली आहे. यातील तीन जणांना वाचवण्यात यश आले आहे. पण पाच जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती मिळाली आहे. आज सकाळी ही दुर्घटना घडली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर येथून काही पर्यटक गणपतीपुळे येथे फिरण्यासाठी आले होते. यातील एकूण आठ (पान ८ वर)

## सैनिक कॉलनी पंपिंग स्टेशन जलकुंभाचे लोकार्पण आ.अनुप अग्रवालांसह अनेक नगरसेवक उपस्थित

**धुळे, दि.२०- शहरातील नगावबारी परिसरात अमृत २.० योजनेंतर्गत सैनिक कॉलनीत पंपिंग स्टेशन जलकुंभाचा लोकार्पण सोहळा शहराचे आ.अनुप अग्रवाल यांच्यासह नगरसेवकांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.**

या जलकुंभामुळे नगावबारी परिसर, कदमबांडे नगर, वलवाडी परिसर तसेच सभोवतालचा कॉलनी भागातील हजारो नागरिकांना नियमित, मुबलक व शुध्द पाणी पुरवठा होणार असून एक दिवसाआड पाणी मिळण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.



अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाण्याच्या समस्येबाबत परिसरातील जनतेला दिलासा मिळणार आहे. जलकुंभाच्या लोकार्पण सोहळ्या प्रसंगी आ. अनुप अग्रवाल यांच्यासह आयुक्त नितीन कापडणीस, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, स्थायी समिती सभापती लताबाई सोनार, महिला व बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे, उपसभापती शोभा भिल, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, (पान ८ वर)

## चाकूचा धाक दाखवून सत्तर हजार लूटले

नंदुरबार, दि.२०(प्रतिनिधी)- पैसे डबल करण्याच्या आमिषातून नंदुरबारला आलेल्या डहाणू येथील दोन युवकांना चाकू धाक दाखवून व मारहाण करीत जबरीने रोकड व मोबाईल असा ७० हजाराचा ऐवज लांबविल्याची घटना नंदुरबार बसस्थानक परिसरात घडली. याप्रकरणी चार अनोळखीविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात खरखडा येथे राहणारे व उत्तर प्रदेशातील बाबतपूर येथील मुळचे रहिवासी यश संजय चव्हाण (वय १८) व त्यांचा मामाचा मुलगा हे दोघे पैसे डबल होण्याच्या (पान २ वर)



## जि.प.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची धुळे पंचायत समितीला भेट व सुचना

**धुळे, दि.२०- जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार यांनी धुळे पंचायत समितीला भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी विभागनिहाय कामकाजाचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.**

यावेळी गटविकास अधिकारी गणेश चौधरी उपस्थित होते. या भेटीदरम्यान घरकुल योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, शिक्षण, आरोग्य, बालकल्याण, पशुसंवर्धन, कृषी, ग्रामपंचायत, आस्थापना, (पान २ वर)

## गरूड मैदानावरील योग दिनी आमदारांसह अनेक मान्यवरांनी गिरवले योगाभ्यासाचे धडे

**धुळे, दि.२०- शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या गरूड मैदानावर आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून आ. अनुप अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवरांनी योग प्रात्यक्षिकाचे धडे गिरवले. योगाभ्यासाच्या या कार्यक्रमात शहरातील हजारो योगप्रेमींनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला.**

आंतरराष्ट्रीय योग दिनी दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. यावेळी आ.अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपूते, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महापौर मायादेवी परदेशी, जिल्हाध्यक्ष



गजेंद्र अंपळकर, माजी आ. राजवर्धन कदमबांडे, मा.खा.डॉ. सुभाष भामरे, क्रीडाधिकारी मनोहर पाटील, विजयसिंह सिसोदिया यांच्याहस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. संयोजन समिती धुळेचे प्रमुख संघटन सरचिटणीस तथा नगरसेवक ओमप्रकाश खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनात हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवला. तसेच शासकीय, निशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनीही योगाचे प्रत्यक्षिक केले.

यावेळी प्रमुख मान्यवरांमध्ये सुधाकर बेंद्रे, प्रशांत मोराणकर, राजेश पाटील, (पान २ वर)

## देशात पन्नास टन सोन्याचा साठा सापडला

मुंबई, दि.२०- जगभरात सोन्याची वाढती मागणी असताना, भारताला ५० टन सोन्याचा साठा सापडला आहे. हा सोन्याचा साठा दक्षिणेकडील आंध्र प्रदेश राज्यात सापडला आहे. आंध्र प्रदेश येत्या काही वर्षांत देशातील सोन्याचा सर्वात मोठा पुरवठादार बनू शकतो. अधिकाऱ्यांच्या मते, यामुळे देशातील सोन्याचे उत्पादन तर वाढेलच, शिवाय सोन्याच्या आयातीवरील देशाचे अवलंबित्वही कमी होईल. एका अधिकाऱ्याने सांगितले की, एकट्या कुर्नूल जिल्ह्यातील जोन्नागिरी गावात अंदाजे ५० टन सोन्याचा साठा सापडला आहे. खाण विभागाचे प्रधान सचिव मुकेश कुमार मीना (पान २ वर)



## महिला सक्षमीकरणासाठी दमदार पाऊल आ.पाटलांच्या हस्ते शिलाई मशीन वाटप

**धुळे, दि.२० - धुळे ग्रामीण मतदारसंघातील शेतकरी, कष्टकरी व महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने विविधांगी उपाययोजना राबविल्या जात आहेत. सक्षमीकरणासाठी दमदार वाटचाल सुरु असल्याचे आमदार राघवेंद्र (राम भदाणे) पाटील यांनी सांगितले.**

आमदार पाटील यांच्या अथक प्रयत्नांतून मंजूर झालेल्या साहित्याचे वाटप उडाणे गावातील गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या २०% सेस निधी अंतर्गत १००% अनुदानावर शेती उपयोगी पाईप, पिठाची गिरणी व शिलाई मशीन या अत्यंत उपयुक्त (पान २ वर)

### दै.आपला महाराष्ट्रच्या पाठपुराव्याला यश

## कपिलेश्वर मंदिराचा अहवाल पाच दिवसांत मागितला कार्यकारी अभियंत्यांसह इतरांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**सोनगीर,दि.२०(प्रतिनिधी) मुडावद (ता. शिंदखेडा) येथील प्रसिद्ध कपिलेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या अपूर्ण पादचारी पुलाच्या कामाबाबत दैनिक आपला महाराष्ट्र मध्ये सविस्तर वृत्त प्रकाशित करून या गंभीर विषयाला वाचा फोडण्यात आली होती. या वृत्ताची आणि माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे नथू धनगर यांनी नाशिक विभागीय कार्यालयापर्यंत केलेल्या पाठपुराव्याची गंभीर दखल घेत प्रशासकीय पातळीवर हालचालींना वेग आला आहे. नाशिक विभागीय कार्यालयाने धुळे अधीक्षक अभियंत्यांना पाच दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक बांधकाम विभाग (धुळे) चे कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, उपअभियंता अजयकुमार पवार व अन्य अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मुडावद येथे जाऊन अपूर्ण कामाची व स्थळ पाहणी केली.**

या पाहणी दौऱ्यादरम्यान मुडावद येथील ग्रामस्थ व भाविकांनी अधिकाऱ्यांसमोर आपली बाजू मांडली. पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, या जोरदार मागणीसाठी १०२ नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांचे सामूहिक निवेदन कार्यकारी अभियंत्यांना सोपवण्यात आले. कपिलेश्वराच्या दर्शनासाठी केवळ स्थानिकच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक येत असतात, मात्र पुलाचे काम अनेक वर्षांपासून रखडल्याने सर्वांनाच नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याकडे गावकऱ्यांनी लक्ष वेधले.पुलाच्या अपूर्ण कामासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचा प्रश्न या पाहणी दरम्यान प्रामुख्याने चर्चेत आला. शिंदखेडा उत्तर विभागाने जमिनीची मागणी करणारे पत्र ग्रामपंचायतीला दिले होते. मात्र, संबंधित जमीन खाजगी शेतकऱ्यांच्या मालकीची असल्याने (पान २ वर)

## एकाच कुटुंबातील पाच जणांना मारहाण

शिरपूर दि.२० (का.प्र.) : तालुक्यातील असली गावात एकाच कुटुंबातील पाच जणांना लोखंडी पाईप व काठीने मारहाण करुन जखमी केल्याच्या संशयावरुन दोन जणांविरोधात थाळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मारहाणीची घटना १७ मे रोजी रात्री आठ ते साडेआठच्या दरम्यान असली गावातील खळ्यात व गावात घडली होती.

शिवदास सुकलाल धनगर (वय ५९ वर्ष) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्यासह कमलाकार शिवदास धनगर, भास्कर शिवदास (पान २ वर)

## बंडखोर खासदारांविरोधात ठाकरेंचा मास्टरप्लॅन! मतदारसंघात उतरणार

**मुंबई, दि.२०- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सहा खासदारांच्या बंडखोरीनंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संघटना मजबूत करण्यासाठी मोठी रणनीती आखल्याची माहिती समोर आली आहे. बंडखोरी केलेल्या खासदारांच्या मतदारसंघांमध्ये स्वत: दौरा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून, यामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे आहेत.**



मिळालेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे हे ईशान्य मुंबई, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशीम आणि शिर्डी या सहा मतदारसंघांचा दौरा करणार आहेत. या दौऱ्याची सुरुवात ईशान्य मुंबई मतदारसंघापासून होणार असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, पक्षातील कार्यकर्त्यांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांबाबत जास्त विचार न करता संघटनात्मक कामावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. जे सोडून गेले त्यांचा विचार करू नका, पुन्हा जोमाने कामाला लागा, असा संदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिल्याचे सूत्रांकडून समजते. धाराशिव मतदारसंघासंदर्भात झालेल्या बैठकीतही ठाकरे यांनी निष्ठावंत शिवसैनिकांना सोबत घेऊन संघटना अधिक मजबूत करण्याच्या सूचना दिल्या. तसेच स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद वाढवण्यासाठी (पान २ वर)



**शिरपूर, दि.२०- आर. सी.पटेल शैक्षणिक संकुलाच्या मुलींच्या फुटबॉल संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पालघर येथे रवाना झाला आहे. वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन मुंबई द्वारे आयोजित आंतर-जिल्हा राज्यस्तरीय १३ वर्षांखालील मुलींची फुटबॉल स्पर्धा १२ जून २०२६ रोजी धुळे येथे आयोजित करण्यात आली होती.**

## आर.सी.पटेल शैक्षणिक संस्थेचा फुटबॉल संघ राज्य.स्पर्धेसाठी रवाना

धुळे जिल्ह्याच्या संघाने या स्पर्धेत सहभाग घेतला. धुळे जिल्ह्याच्या फुटबॉल संघात शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या ९ विद्यार्थिनींची निवड झाली होती. दि. २१ ते २५ जून २०२६ दरम्यान राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पालघर येथे संघ रवाना झाला.

यात मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल शिरपूर येथील नित्या रविंद्र शिरसाठ, काव्या (पान ८ वर)

## भंगाराचा वाद एकास मारहाण

**शिरपूर दि.२० (का.प्र.) : घरासमोर भंगार ठेवल्याचा जाब विचारल्याचा राग आल्याने तिघांनी एकास मारहाण केल्याची घटना शहरातील गणेश कॉलनीत घडली.**

फरीदुद्दीन नवाजउद्दीन शेख (वय ३५) असे मारहाण झालेल्या युवकाचे नाव असून तो व्यवसायाने ड्रायव्हर आहे. त्याला संशयित नासीर बशीर शेख, नाविद नासीर शेख व रिजवान शेख सर्व र.गणेश कॉलनी यांनी मारहाण केली. पोलिसांनी संशयितांविरोधात गुन्हा दाखल केला असून हवालदार राजेंद्र रोकडे तपास करीत आहेत.



## आदिवासी भागात मोहिम जोरात २०४७ पर्यंत देश सिकलसेल मुक्त

धुळे, दि.२०- केंद्र शासनामार्फत १ जुलै २०२३ पासून राष्ट्रीय सिकलसेल निमिया निर्मूलन मिशन राबविण्यात येत असून, याद्वारे सन पर्यंत देशातून सिकलसेल आजाराचे समूळ उच्चाटन करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात (पान ८ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,33,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,45,500 रु.+3% GST
चांदी- 2,35,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## धुळ्यात गॅस, डिझेल चोरांची टोळी दहा जणांविरुद्ध गुन्हा, तिघे अटकेत

**धुळे, दि.२० - गॅस, डिझेल चोरणाऱ्या टोळीवर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या राज्य दक्षता पथकाने दहिवेलजवळ (ता. साक्री) कारवाई केली. याप्रकरणी दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. त्यातील तिघांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. अन्य संशयितांची नावे समजू शकली नाही.**

नागपूर -सुरत महामार्गावरील दहिवेल जवळ टँकरमधून इंधनाची अवैधरित्या चोरणाऱ्या टोळीतील तिघांना राज्य दक्षता पथकाने कारवाई करीत पकडले. गॅस, डिझेल टँकर, सिलिंडर आदी कोटी लाख हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गॅस टँकर चालक हयात सिंह, टँकर मालक, चालक राजबली यादव, टँकरचा मालक अमिन पटेल, सचिन बाबा, दोन बोलेरो पिकअप व्हेनचे चालक, मालक, दोन आयशरचे आयशर मालक, घटना घडली त्या जागेचा मालक असे एकूण दहा जणांविरुद्ध साक्री पोलीस ठाण्यात (पान ८ वर)

## पान १ वरुन

## बीज वाटपातील गैरसोयींमुळे शेतकरी त्रस्त

त्यामुळे ७५ किलो बियाण्यासाठी दोन ३० किलोच्या पिशव्या आणि अतिरिक्त १५ किलो बियाण्याची गरज भासते. मात्र १५ किलोचे स्वतंत्र पॅकिंग उपलब्ध नसल्याने दुसरा शेतकरी येण्याची वाट पाहून किलोच्या पिशवीतील बियाणे १५-१५ किलो असे विभागून घ्यावे लागत आहे. वितरण केंद्रावर वजनकाटा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना जवळच्या किराणा दुकानात जाऊन बियाण्यांचे वजन करून विभागणी करावी लागत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच वितरण केंद्रावर कृषी विभागाचा कोणताही अधिकारी किंवा प्रतिनिधी उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सांगण्यात आले आहे. निवेदनात आणखी नमूद करण्यात आले आहे की, बियाण्याच्या पिशव्या गोदामातून स्वतः उचलून आणण्याची जबाबदारीही शेतकऱ्यांवर टाकण्यात आली आहे. त्यामुळे वयोवृद्ध आणि लहान शेतकऱ्यांना विशेषतः अडचणी निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचवण्यासाठी पिंपळनेर येथे स्वतंत्र बीज वितरण केंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या पावसाळ्याच्या प्रारंभाची प्रतीक्षा करत असलेला शेतकरी आधीच चिंतेत आहे. अशा परिस्थितीत कृषी विभागाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत सुलभपणे पोहोचावा यासाठी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

कृषी विभागाची कार्यपद्धती शेतकऱ्यांना सोयीची नसून त्रासदायकच ठरत आहे. वितरण केंद्रावर कृषी विभागाचे अधिकारी किंवा कर्मचारी स्वतः उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांना अडचणी मांडता येत नाहीत. याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात तसेच अरेरावीची भाषा वापरली जाते त्यांनी केला. तुमच्याकडून जे होईल ते करून घ्या, अशा प्रकारची उर्मट भूमिका संबंधित अधिकाऱ्याने घेतली. उपस्थित पत्रकारासोबतही हुज्जत घालण्याचा प्रयत्न केला.

**- हर्षल बिरारीस, सामाजिक कार्यकर्ता, बल्हाणे.**

## चाकूचा धाक दाखवून सत्तर हजार लूटले

लालसेपोटी रोकड घेवून नंदुरबार येथे आले. हे दोघेही नंदुरबार बसस्थानक परिसरातून जात असतांना चार अनोळखींनी त्यांना अडविले. यावेळी शिवीगाळ व मारहाण करीत अनोळखींनी चाकूचा धाक दाखवून यश संजय चव्हाण व त्यांचा मामाच्या मुलाकडील ५०हजाराची रोकडसह २० हजाराचा मोबाईल संशयीतांनी जबरीने चोरुन नेला. याबाबत यश संजय चव्हाण यांनी नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेकॉ. नरेंद्र चौधरी करीत आहेत.

## गरूड मैदानावरील योग दिनी आमदारांसह

प्रजापिता ब्रम्हाकुमारी संस्थेच्या रिटा दिदी, रवी बेलपाठक, शिल्पा म्हसकर, एन.के.उपाध्ये, माजी जि.प.अध्यक्षा धरती देवरे, ॲड. समीर पंडीत, ॲड.राहुल भामरे, नगरसेविका प्रतिभा चौधरी, माजी महापौर जयश्री अहिरराव, भाजपाचे डॉ.सुशिल महाजन उपस्थित होते. डॉ.राजेंद्र निकुंभ यांनी योग प्रत्यक्षिकाचे संचलन केले. सुत्रसंचलन अमित गोराणे यांनी केले तर आभार ॲड.वाय.एल. जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र बारे, डॉ.भूपेंद्र मालपूरे, मनोहर चोधरी, राकेश जैन, अतुल दहिवेलकर, प्रकाश पांडे, विजय पाटील, मनोज वाघ, मोनाली पगारे, राजश्री शेलकर, किरण मांडे, विनीत जैन, गुलाब ठाकरे, दिलीप बागुल, डॉ.भालचंद्र मोरे, पवन जाजू, शामसुंदर पाटील यांनी परिश्रम घेतले.

## जि.प.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची

ई-ऑफिस तसेच ग्रामस्थांकडून ऑनलाइन प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या निवारण प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत व प्रभावीपणे निवारण करण्यावर भर देण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी बेलदार यांनी क्षेत्रीय स्तरावर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजाबाबत माहिती घेतली. क्षेत्रीय अधिकारी-कर्मचारी नियोजित दौऱ्यानुसार कार्यरत आहेत की नाही, याची नियमित पडताळणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच ग्रामपंचायत तपासणीबाबत विस्तार अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन ग्रामपंचायतींची नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. चौकशीदरम्यान तक्रारीत तथ्य आढळल्यास तत्काळ आवश्यक कार्यवाही करून अहवाल सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

कामकाजात पारदर्शकता, जबाबदारी आणि कार्यक्षमतेला प्राधान्य देत नागरिकांना ग्रामविकास विभागाच्या सेवा तत्परतेने उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी बेलदार यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

## पान १ वरुन

## महिला सक्षमीकरणासाठी दमदार पाऊल

साधनांचे वाटप करण्यात आल्याने लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नगाव येथे आमदार राघवेंद्र पाटील यांच्या हस्ते या साहित्य वाटप कार्यक्रमाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी परिसरातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व साहित्याचे प्रत्यक्ष वाटप आमदार भदाणे यांच्या हस्ते करण्यात आले.

**स्वावलंबन हेच मुख्य ध्येय - आमदार पाटील**

यावेळी आमदार पाटील म्हणालेत, ग्रामीण भागातील शेतकरी बांधव, कष्टकरी आणि महिला भगिनींना स्वावलंबी बनवणे, त्यांच्या हाताला रोजगार देणे आणि त्यांना आत्मनिर्भर करणे हेच आपल्या राजकारणाचे आणि समाजकारणाचे मुख्य ध्येय आहे. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीतून विकास साधण्यावर आमचा भर आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शेतकऱ्यांना शेतीसाठी पाईप मिळाल्याने पाणी व्यवस्थापन सोपे होऊन उत्पादन वाढीस मदत होईल. स्वतःकडे पिठाची गिरणी उपलब्ध झाल्याने महिला व शेतकऱ्यांचा वेळ व पैसा वाचेल. तसेच शिलाई मशीनमुळे महिला भगिनींना घरबसल्या स्वयंरोजगाराची संधी मिळून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. हे केवळ साहित्य वाटप नसून ग्रामस्थांच्या सक्षमीकरणाचे दमदार पाऊल आहे.

उडाणेतील शेती उपयोगी पाईपचे लाभार्थी बाबुलाल भाऊराव शिंदे, विश्वास रामदास राऊत, भटू राजाराम बागुल, हिरालाल तोलाराम शिंदे, आशाबाई गमन शिंदे, यमुनाबाई कमळकर मोरे, ज्ञानेश्वर वंजी बागुल, ज्ञानेश्वर विश्वास शिंदे व किरण तुकाराम शिंदे. पिठाची गिरणी लाभार्थी ज्ञानेश्वर जगन्नाथ वाघ, प्रताप पाटील, रामभाऊ राजाराम हाके, केवळबाई सतुलाल पाटील, राहुल किशोर पाटील, विजय देवचंद पाटील व ललिता ज्ञानेश्वर वाघ. शिलाई मशीन लाभार्थी सुवर्णा मयुर मोरे, कविता देवेंद्र शिंदे, अश्विनी रोहिदास शिंदे, माधुरी भटू बागुल व माधुरी जितेंद्र पाटील.

**मतदारसंघाच्या विकासासाठी कटिबद्ध**

धुळे ग्रामीण मतदारसंघातील प्रत्येक गावाचा, प्रत्येक कुटुंबाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. यापुढेही लोककल्याणकारी योजना राबवून शेतकरी व महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याचा आमचा प्रयत्न राहील, असा विश्वास आमदार भदाणे यांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे उडाणे गावातील शेतकरी व महिलांना स्वयंरोजगाराची नवी दारे खुली झाली असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. तालुक्यातील इतर गावांमध्येही टप्प्याटप्प्याने अशा योजनांची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## कपिलेश्वर मंदिराचा अहवाल पाच दिवसांत मागितला

ग्रामपंचायत यात थेट हस्तक्षेप करू शकत नाही. ही जमीन गावठाण किंवा गुरचर असती, तर ग्रामपंचायतीने नक्कीच सहकार्य केले असते, त्यामुळे या विलंबाचे खापर ग्रामपंचायतीवर फोडू नये, अशी स्पष्ट भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. या संदर्भात मुडावद ग्रामपंचायत लवकरच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद धुळे यांना सविस्तर खुलासा पाठवणार आहे.पाहणी दरम्यान संबंधित शेतकऱ्यांनी पुलासाठी आवश्यक असलेल्या जमिनीबाबत आपल्या मागण्या प्रशासनासमोर स्पष्ट केल्या. जमिनीचा योग्य मोबदला तात्काळ मिळावा. बाधित शेतकरी कुटुंबातील पात्र सदस्याला प्रकल्पग्रस्त म्हणून सरकारी सेवेत सामावून घेण्याचा विचार व्हावा. सार्वजनिक बांधकाम विभागाने या संदर्भात धुळे जिल्हाधिकाऱ्यांशी थेट पत्रव्यवहार करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, तरच हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागू शकतो, असे मत गावकऱ्यांनी व्यक्त केले आहे. आता जिल्हा प्रशासनाने जनभावनेचा आदर करून तातडीने सकारात्मक पावले उचलावीत आणि हा पादचारी पूल लवकरात लवकर पूर्ण करावा, अशी आग्रही मागणी जोर धरू लागली आहे.

## देशात पन्नास टन सोन्याचा साठा सापडला

यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले की, जोन्नागिरी व्यतिरिक्त, सोन्याच्या खाणकामासाठी आणखी चार संभाव्य जागा निश्चित करण्यात आल्या आहेत: रामगिरी, जाववाकुला आणि चिगुरुकुंटा बिसकटम. खाण विभागाचे प्रधान सचिव मुकेश कुमार मीना यांनी असा अंदाज व्यक्त केला की, एकट्या जोन्नागिरीमध्येच ५० टन सोने आहे. त्यामुळे, आंध्र प्रदेश येत्या काही वर्षांत देशातील सोन्याचा सर्वात मोठा पुरवठादार बनू शकतो. या खनिजसंपन्न क्षेत्रांचे अधिक विकास करण्याची योजना सरकार आधीच आखत आहे.


## एकाच कुटुंबातील पाच जणांना मारहाण

धनगर, अरुणाबाई शिवदास धनगर व मेहुल कमलाकर धनगर (सर्व रा.असली) यांना संशयित राजेंद्र बाबूराव धनगर व कुलदीप राजेंद्र धनगर यांनी मारहाण करुन जखमी केले. हवालदार संजय धनगर तपास करीत आहेत.

## बंडखोर खासदारांविरोधात ठाकरेंचा

आणि कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले जात आहे. सहा खासदारांच्या बंडखोरीनंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीत उद्धव ठाकरे यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, त्यातून पक्ष संघटनेला नवी ऊर्जा देण्याचा प्रयतक केला जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## प्रकाश में आज




धर्मेन्द्र, रेखा, रणजीत, मदनपुरी, अरुणा ईराणी, जगदीप

## एमएएच फार्मसीचा ९५ टक्के निकाल

शिरपूर दि.१८ (का.प्र.)- येथील किसान विद्या प्रसारक संस्थेच्या संचलित महाराणी अहिल्याबाई होळकर कॉलेज ऑफ फार्मसीचा (डी.फार्मसी) प्रथम व द्वितीय वर्षाचा ९५ टक्के निकाल लागला. प्रथम वर्षात जयेश सोनवणे (७९), जया बोरसे (७६) व पूजा बडगुजर (७४.७०) तर द्वितीय वर्षात मोनिका कोळी (८०.२७), जागृती चव्हाण (७९) व रोशन पावरा (७८) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.

## डोंगरगाव जि.प.शाळेत सहविचार सभा संपन्न

शहादा,दि.२० (का.प्र.) - स्थानिक जिल्हा परिषद केंद्रशाळा डोंगरगाव येथे माता-पालक संघाची सहविचार सभा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शाळेच्या वतीने आयोजित या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजेंद्र पाटील होते. या सभेला गावातील माता-भगिनी आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

सभेदरम्यान पालकांना पाल्यांच्या शिक्षणाविषयी व आरोग्याविषयी जागृत करण्यासाठी विविध शिक्षकांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यामध्ये विषयतज्ज्ञ राजेंद्र धनगर यांनी शासनाच्या विविध शालेय योजना, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा आणि शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. ज्येष्ठ शिक्षिका सुनंदा निकवाडे यांनी मुलांच्या जडणघडणीत आणि शिक्षणात पालकांचा सहभाग किती महत्त्वाचा आहे, हे स्पष्ट केले. जयश्री महाजन यांनी विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीवर भर देत, पाल्यांना दररोज शाळेत पाठविण्याचे आवाहन केले.

## निधन वार्ता

### शंकरलाल जैन

धुळे, दि.२०- शहरातील आग्रा रोडवरील व्यापारी शंकरलाल तानीराम जैन शामसुखा यांचे संथारा मरण झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात भाऊ, वहिनी, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. ते महेश जैन व निलेश जैन यांचे वडील होत.

# द्वेता पटेल नथवाणी यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा क्षयरोगमुक्तीसाठी पोषण आहार वाटप

**शिरपूर, दि.२०- समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत सौ. द्वेता पटेल नथवाणी यांच्या वाढदिवसानिमित्त धुळे जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्देशाने पोषण आहार किट वितरणाचा दुसऱ्या टप्प्याचा उपक्रम राबविण्यात आला. अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाची सुरुवात शिरपूर येथील आमदार कार्यालयातून करण्यात आली होती.**




द्वेता पटेल नथवाणी यांच्या संकल्पनेतून तसेच माजी मंत्रीआमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणी चेअरमन भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. भारत सरकारच्या प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियान अंतर्गत शिरपूर तालुक्यातील क्षयरोग (टीबी) रुग्णांना मोफत पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले.

यावेळी अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे सौ. द्वेता पटेल नथवाणी यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण धुळे जिल्ह्यातील टीबी रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्याची घोषणा करण्यात आली होती. जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून उपचार घेत असलेल्या सुमारे ७०० रुग्णांना त्याचा लाभ मिळत आहे.

उपक्रमाच्या दुसरा टप्प्यात धुळे व साक्री क्षयरोग उपचार पथकांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांना एकूण ६९ पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. यामध्ये धुळे (काळखेडे) येथील १७ तर साक्री येथील ५२ लाभार्थ्यांचा समावेश होता. पुढील टप्प्यात शिंदखेडा, दोंडाईचा, साक्री, पिंपळनेर, धुळे आणि सोनगीर परिसरातील लाभार्थ्यांना पोषण किटचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती अस्तित्व फाऊंडेशन तर्फे देण्यात आली.

वितरित करण्यात आलेल्या पोषण आहार किटमध्ये सोयाबीन तेल, शेंगदाणे, मुगडाळ, तांदूळ, सोयाबीन वडी, गहू पीठ, हरभरे, गूळ आणि प्रोटीन पावडर यांसारख्या पौष्टिक पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. टीबी रुग्णांच्या आरोग्य सुधारण्यासाठी आणि उपचार प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी या पोषण किटची मदत होत आहे.

या प्रसंगी धुळे येथील काळखेडे येथे अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या समन्वयक सौ. सोनिया भसिन, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी, एम. ओ. डॉ. योगिता चव्हाण, पी. पी. एम. सौ. प्रतिभा पाटील, एच. ए. मारुती गायकवाड, एम. पी. डब्लू. जतीन चांगरे, तसेच साक्री येथे टी. एच. ओ. डॉ हितेंद्र गायकवाड, ए. टी. एच. ओ. डॉ. राहुल पवार तसेच फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. भविष्यातही समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार संस्थेने यावेळी व्यक्त केला.

✲ धुळे, दि.२०- शहरातील देवपूर नकाणे रोड परिसरात वीज वितरणकडून दुपारी तसेच मध्यरात्री वारंवार वीज पुरवठा खंडीत केला जात असल्याने भर नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**जाहीर नोटीस**

श्री.बी.जे.जयस्वाल, ॲडव्होकेट, शहादा
ता.शहादा, जि.नंदुरबार

### शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो., (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज क्रं.२१९/२०२६, नि.६

शितलकुमार ईश्वरलाल जायसवाल ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....सामनेवाला
कै.ईश्वरलाल हिरालाल जायसवाल ....मयत

अर्ज:- दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी

ज्याअर्थी कै.ईश्वरलाल हिरालाल जायसवाल यांचा मृत्यु दि.०४/०३/२०२६ रोजी शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार येथे झाला ते शहादा, ता.शहादा येथील रहिवासी होते. त्यांचे पश्चात त्यांना १) मिनाबाई ईश्वरलाल जायसवाल, २) शितलकुमार ईश्वरलाल जायसवाल, ३) अतुल ईश्वरलाल जयसवाल असे एकूण ०३ वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टमधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात दि.कि.अर्ज नं.२१९/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.२४/७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत:अगर वकिलांमार्फत शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. व.स्त. शहादा यांचे न्यायालयात हजर राहुन लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटिसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ति स्वत:अगर आपल्या वकिलांमार्फत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज तारीख १२/६/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

आदेशावरून
क.लिपीक (शिक्का) अधिक्षक
म.दिवाणी न्यायालय (व.स्तर) शहादा

**जाहीर नोटीस**

श्री.पी.एन.जैन, ॲडव्होकेट, शहादा
ता.शहादा, जि.नंदुरबार

### शहादा येथील महाशय दिवाणी न्यायाधिश सो., (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज क्रं.२३६/२०२६, नि.७

बनेचंद सुभागमल जैन, उ.व.७३, धंदा- व्यवसाय,
रा.प्लॉट नं.२२, श्रीराम कॉलनी, शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार.....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....सामनेवाला
कै.सुभागमल गोरखचंद जैन, (मृत्यू दि.२५/०१/२०१७) ....मयत

अर्ज:- दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चॅप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील मयत कै.सुभागमल गोरखचंद जैन हे मौजे शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार येथील रहिवासी होते व त्यांचा मृत्यु दि.२५/०१/२०१७ रोजी मौजे शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार येथे झालेला असल्याने त्यांचे पश्चात त्यांना अर्जदार- १) बनेचंद सुभागमल जैन- मुलगा हे कायदेशीर वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात दि.१७/०६/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.२८/७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत:अगर वकिलांमार्फत शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर शहादा यांचे न्यायालयात हजर राहुन लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटिसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी किंवा नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसांचे आंत कोणीही व्यक्ति स्वत:अगर आपल्या वकिलांमार्फत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज तारीख १९/६/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

आदेशावरून
क.लिपीक (शिक्का) अधिक्षक
म.दिवाणी न्यायालय (व.स्तर) शहादा

### शब्दकोडे क्रमांक : २३९३

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ■ | ५ | | ६ | ■ | ७ | ८ |
| ■ | ९ | | १० | | | | ■ | ११ | १२ | | |
| १३ | | ■ | १४ | | ■ | १५ | १६ | ■ | १७ | | ■ |
| | ■ | १८ | | ■ | १९ | ■ | २० | २१ | | ■ | २२ |
| ■ | २३ | ■ | २४ | | | २५ | ■ | | ■ | २६ | ■ |
| २७ | | २८ | | ■ | २९ | | ३० | ■ | ३१ | | ३२ |
| ■ | ३३ | | ■ | ३४ | | ■ | ३५ | ३६ | | ■ | |
| ३७ | ■ | ३८ | | | ■ | ३९ | ■ | | ■ | ४० | |
| ४१ | ४२ | | ■ | ४३ | ४४ | | | ■ | ४५ | | ■ |
| ४६ | | ■ | ४७ | ■ | ४८ | | ■ | ४९ | ■ | ५० | ५१ |
| ■ | ५२ | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ■ | ५६ | | |
| ५७ | ■ | ५८ | | | ■ | ५९ | | | ■ | | ■ |

**आडवे शब्द :** **१.**आश्चर्य किंवा अचंबा वाटणारी गोष्ट **५.**देशात व्यवहारासाठी वापरले जाणारे अधिकृत नाणे किंवा नोटा **७.** गाडीचे पाय **९.** पोलीस ठाण्यात किंवा न्यायालयात दाद मागण्यासाठी अर्ज करणारी व्यक्ती **११.**सूर्याचे एक प्रसिद्ध समानार्थी नाव **१३.**समाजात मिळणारा आदर किंवा शरीराचा एक भाग **१४.**कपाटातील कप्पा किंवा ब्लाउज पीससाठी वापरले जाणारे कापड **१५.**हॉटेल किंवा दुकानात खरेदी केल्यानंतर मिळणारे पैशांचे पत्रक **१७.**'तर' सोबत जोडीने येणारा शब्द **१८**'परंतु' चा समानार्थी शब्द **२०.** बुद्धिबळाच्या पटावरील राजाचा सर्वात शक्तिशाली साथीदार **२४.**समर्थ रामदास स्वामींनी रचलेला प्रसिद्ध ग्रंथ **२७.**'रविवार' या वाराला ग्रामीण किंवा बोलीभाषेत म्हटले जाणारे नाव **२९.**धरित्री **३१. उर्दूत-घसा,स्वरयंत्र** **३३.**पुरुष किंवा मनुष्यप्राणी ३४.नप-उलट लिहा **३५.** शारदीय नवरात्रातील किंवा महिन्यातील नववा दिवस **३८.**आकाशात चमकणारी वीज **४०.**१२ नंतर आणि १४ च्या आधी येणारी संख्या **४१.**दोन व्यक्तींमध्ये होणारे अर्थपूर्ण संभाषण **४३.**प्रभू रामचंद्र यांचे एक नाव **४५.**अत्यंत वाईट अवस्था किंवा फजिती होणे **४६.**खिडकीला असणारी लोखंडी सळई ४७एक मराठी सिनेमा ' * सध्या काय ? करतेय' **४८.**केसांची कपाळावर येणारी लाडकी बट ४९.इंग्रजीत-नाही ५०.भगवंताने दाखवलेला चमत्कार **५२.**दोन दशके म्हणजेच ही संख्या **५४.**कोणत्याही समस्येवर काढलेला उपाय किंवा मार्ग **५६.**दिवाळीत बनवले जाणारे चवदार खाद्यपदार्थ (लाडू, चिवडा इ.) ५७.संगीत सप्तकातील अखेरचा स्वर **५८.**उसळ किंवा भाजी करण्यासाठी वापरले जाणारे एक पांढरट हिरवे कडधान्य **५९.**घराच्या सभोवतालचा परिसर किंवा मोकळी जागा

**उभे शब्द :** **२.**पूर्वजांकडून मिळालेली हक्काची जमीन किंवा जहागीर **३.** इंग्रजीत नशीब किंवा भाग्य **४.**सणासुदीला घराच्या मुख्य दरवाजावर बांधली जाणारी पाना-फुलांची माळ **५.**शरीरात जमा होणारे अतिरीक्त मेद **६.** डोंगरातून उगम पावून समुद्राला मिळणारा पाण्याचा मोठा प्रवाह **७.**मालकाच्या घरी सेवा करणारा नोकर किंवा सेवक **८.**हात १०.पहारेकरी **१२.** दृष्टी किंवा एखाद्यावर ठेवलेली देखरेख १३.सामान १६.अंगावरील बारीक केस १९.लोकांच्या मनातील अज्ञान,अंधश्रद्धा दूर करून त्यांना योग्य ज्ञान, विवेक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन देणे २१.यश २२.पती **२३.**नैतिक अधोगती **२५.**एखाद्या वस्तूला घट्ट पकडण्याची आज्ञा २६.बुद्धिबळातील डाव २८.हिंदीत -घटना ३०.दोन नंतर येणारी संख्या ३१.खात्री ३२.धोका ३४.दुधापासून बनवला जाणारा एक पदार्थ ३६.माराचे वण **३७.**आयुष्यात घडणारी एखादी घटना किंवा वेळ ३९.सतत गोड वाटणारे ४०. भारतीय कवी, विद्वान, विचारवंत आणि विजयनगरचे महाराज राजा कृष्णदेवराय यांच्या दरबारातील विशेष सल्लागार ४२.परवडणाऱ्या दरातला ४४.एक निशाचर पक्षी ५१.मुखरस ५३.पास-उलट लिहा ५४.व्यवसायातील हानी ५५.छातीठोकपणे सांगितलेला अधिकार

### शब्दकोडे क्रमांक : २३९२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | त | रं | ग | ■ | चा | क | र | मा | नी | ■ | का |
| त | ■ | भा | रू | ड | ■ | पा | ■ | ठ | ■ | मा | या |
| र | जा | ■ | ड | ■ | प | त | न | ■ | स | त | ■ |
| ■ | ल | हू | ■ | खो | ड | ■ | वा | य | दा | ■ | म |
| प्र | ■ | ल | ता | ■ | सा | ज | ■ | म | चा | न | ■ |
| ता | ल | ■ | ग | ड | द | ■ | मो | ■ | र | ग | डा |
| प | ग | डी | ■ | गा | ■ | प्र | सा | द | ■ | र | ■ |
| ग | ■ | प | र | ■ | भा | ■ | द | ■ | नी | ■ | सा |
| ड | ल | ■ | मा | न | व | ता | ■ | का | र | भा | र |
| ■ | ग | ट | ■ | ट | ■ | न | ग | ■ | ज | र | ■ |
| दा | ब | ■ | वै | रा | ग्य | ■ | ग | दा | ■ | त | न |
| ■ | ग | हू | ■ | ज | ■ | स | न | म | रे | ■ | स |










रविवार २१ जून २०२६

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.i







# प्रगत नाविकशास्त्र

छत्रपती शिवाजी महाराज भारतीय नाविक दलाचे जनक होत.छत्रपतींनी प्रगत नाविकशास्त्र बनवूण वैज्ञानिकतेचा पाया घातला. सागरी तंत्रामध्ये अमुलाग्र बदल केले.मध्ययुगीन कालखंडात विकसित सागरी युध्द-साहित्याचा वापर ही त्यावेळची अभूतपर्व अशी घटना होय. त्यामध्ये सागरी आरमार व लढाय्यांमध्ये वापरलेली क्षेपणास्त्रे महत्वाचे घटक होते.देशाचे संरक्षण स्थलसेना, वायुसेना व नौसेना यांच्याकडून होत असते. छत्रपतींनी स्थलसेना व नौसेना यांचे महत्व ओळखुन अजिंक्य अशी संरक्षण यंत्रणा उभी केली.त्यांनी समुद्रकिणारा,जहाज बांधणी,वातावरणातील बदल,नाविकता,खगोलशास्त्र याव्दारे नव-नविन तंत्रज्ञान विकसित केले. भौगोलिक परिस्थितीचा अचूक उपयोग करून नैसर्गिक अभेद्यता लक्षात घेऊन सागरी सुरक्षितता ताकदवान बनविली.

**सागरी सामर्थ्य-** मध्ययुगीन कालखंडामध्ये हिंदूस्थानातील कोणत्याही शासनकर्त्याला युध्द सामुग्रीने सुसज्ज असे आरमार उभा करता आले नाही. ते प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराजांनी उभा केले.सागरी युध्दाच्या इतिहासामध्ये विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, कुलाबा, रतक्दुर्ग, दांडा-राजापुरी, खांदेरी, उंदेरी या किल्ल्यांना महत्वाचे स्थान होते. महाराजांनी आरमाराचे महत्व ओळखुन स्वराज्यामध्ये सुसज्ज असे नाविक तंत्रज्ञान उभे केले. अज्ञापत्रामध्ये आरमाराचे महत्व विशेद केले आहे ते असे ;आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र याकरिता आरमार आवश्य करावे.

**गतीमान युध्दसामुग्री व सुसज्ज युध्दनौका-** छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६५७मध्ये कल्याण-भिवडी घेतल्यावर महत्वपूर्ण अशा सागरी युध्द सामुग्रीस व आरमार बांधणीस सुरूवात केली व इ. स. १६५६ या वर्षी मराठा आरमाराचा प्रारंभ केला. कल्याण-भिवंडीपाशी दुर्गाडीचा किल्ला बांधून तेथे आरमाराची सुरूवात



केली आणि त्याचा विस्तार सागरी भागामध्ये करून किणारपट्टीचे संरक्षण केले. इ. स. १६६६ मध्ये छत्रपतींचे आरमारी सामर्थ्य एवढे वाढले की इंग्रजांना त्यांची भिती वाटू लागली. विजयदुर्ग, पनवेल, कुलाबा, कल्याण, भिंवडी व मालवण येथे उत्कृष्ट प्रकारची जहाजे, तारवे, गलबते बांधली जात असत.सिंधुदुर्ग हा सागरी किल्ला आरमाराचे मुख्य केंद्र होते.छत्रपतींच्या आरमारात तरांडी, गलबते, शिबाड, गुराबा, तारू, पगार, तिरकाटी, माचवा, बाभोर, पाल, होडी,महागिरी, पारख, जुग, लहकुरी इ. जहाजे होती. दर्यासारंग व मायनायक हे छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रमुख आरमारी अधिकारी होते. स्वराज्यामध्ये ७५० सुसज्ज अशी जहाजे होती. सागरामध्ये ५००० नाविक सैन्य सज्ज असे.

**बसरूर स्वारी म्हणजे शस्त्र सज्जतेचा विजय-** छत्रपतींनी सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज, जंजिरेकर या परकीय सत्तांबरोबर दोन हात करण्यासाठी सागरी युध्द सामुग्रीला व आरमाराला चालना देऊन सागरावर मराठ्यांचा दबदबा निर्माण केला. ८ फेब्रुवारी १६६५ रोजी महाराजांनी आपली ८५ जहाजे व तीन मोठी गलबते असलेले आरमार बरोबर घेऊन स्वतः तारवांतुन जाऊन बसरूरची स्वारी यशस्वी केली. बसरूरवरील विजय म्हणजे छत्रपतींच्या नाविक युध्द सामुग्रीचा व सामर्थ्याचा विजय होय. आजही बसरूरचे लोक हा दिवस मोठ्या उत्साहाने बसरूरचा स्वतंत्र दिवस म्हणून साजरा करतात आणि त्याचे सर्व श्रेय ते छत्रपती शिवाजी महाराजांना देतात.

**क्षेपणास्त्राचा वापर-** स्वराज्यातील आरमार वर्षातील आठ महिने खुल्या सागरावर शौर्य गाजवत असे. ज्यावेळेस पावसाळा सुरू होई ते चार महिने सुरक्षित ठिकाणी छावणी करून असे.प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या ठिकाणी छावणी हे त्याचे वैशिष्ट्य होते. ही छावणी पावसाळा सुरू होण्याअगोदर म्हणजेच समुद्राला उधाण येण्या पूर्वी होत असे. सागरी युध्दामध्ये छत्रपतींनी क्षेपणास्त्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला. या क्षेपणास्त्रामध्ये तोफा, बंदुका, सुतरनाल, गजनाळ, जेजांले यांचा समावेश होता.दारूगोळा, तोफा आणि बंदुका या पोर्तुगीज, डच, फ्रेंच या परकीय सत्तांकडूनही विकत घेतल्या जात असत. छत्रपतींनी सागरी लढाय्यांमध्ये दारूगोळयाचा वापर करून क्रांती केला.

**जहाजांसाठी लागणारे टिबर जातीचे लाकुड-** छत्रपतींनी मुंबई जवळील खांदेरी बेटावर तटबंदी उभी करून तेथे नौदलाचे केंद्र स्थापन केले. कल्याण, भिंवडी येथे जहाजे आणि घरे बांधण्यासाठी लागणारे टिबर जातीचे लाकुड मुबलक प्रमाणात मिळत असे. या लाकडाला इंग्रज 'भारताचा ओकवृक्ष' म्हणत. छत्रपतींनी कोकणातील कल्याण नजीकच्या परिसरातील उत्तम प्रतीच्या सागवानी लाकडाचा वापर करून कल्याण व भिंवडी येथे जहाजे व लढाऊ गलबते बनविली.

**जहाज बांधणीचे कारखाने-** हर्णे, अंजनवेल, जैतापूर, राजापूर, रतकागिरी ही बंदरे मध्ययुगीन कालखंडामध्ये वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाची होती.छत्रपतींनी सिंधुदुर्ग,विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सोनगड येथे आरमारी ठाणी उभी केली. परकीय सत्तांना शह देण्यासाठी खांदेरी बेटावरती किल्ला बांधुन लष्करी तळ उभा केला. युध्दनौका व व्यापारी नौका यांना संरक्षण देऊन युध्दनौका दुरूस्त करणारे तळ त्यांनी राजापूर, रतकागिरी, अंजनवेल या ठिकाणी उभे केले. सुसज्ज नौदलामुळे परकियांना मराठा आरमाराचा धाक वाटत असे. आगाशी व वसई येथे बांधली जाणारी जहाजे त्याकाळच्या पोर्तुगीज जहाजांच्या तोडीची होती. पेन, कल्याण, भिंवडी,पद्मदुर्ग येथे जहाज बांधण्याचे कारखाने होते.विजयदुर्ग व कुलाबा येथे लढाऊ जहाजांवरील तोफा व दारूगोळा ठेवण्याच्या जागा होत्या.

**रिपेअरिंग युनिटस-** छत्रपतींच्या कालखंडामध्ये सागरी किणाऱ्यावरील रत्नागिरी जिल्हयातील रतक्दुर्ग किल्लयाच्या दक्षिणेला तरता तराफा तयार करण्यात आलेला होता. भुयारामध्ये हे ठाणे निर्माण केल्यामुळे सागरामध्ये शत्रूबरोबर युध्द सुरू असताना जहाज खराब झाले तर त्याला या ठिकाणी आणुन डागडुजी करून जायबंदी जहाज पुन्हा मोहिमेवर रवाना केले जात असे. यालाच आधुनिक भाषेत फ्लोटिंग डॉक्स फॉर बेस रिपेअरिंग युनिटस असे म्हटले जाते. **(पान ६ वर)**

# 'मी' पणाचा त्याग सुखी जीवनाची गुरुकिल्ली

माझा,माझीचा मीपणा** **अहंकार**.

आजकाल माझा,माझी मी हा अहंकाराने बरबटलेला शब्द क्षणोक्षणी कानावर पडला जातो. एवढच नाही तर त्याची पाळमुळ खोलवर विनाकारण,विनासायास ह्रदयातील अंतर्गत कप्प्यात रूजलेली असतात.आपलेपणाला लागलेल्या या ओहटीची फार खंत वाटते.

माझा माझीचा मीपणा रसनेवर अविरत रेंगाळत असतो.याला विचारांचे बदलेले स्वरूप म्हणावे की कालानुरूप बदलेली मानसिकता म्हणावी.

जेव्हां माझी नोकरी,माझ ऑफीस माझ घर,माझ स्वयंपाकघर,माझा संसार,माझी बायको,माझा नवरा माझी मुलं,माझे दागिने,माझी संपत्ती ही बिरूदावली मुखा वाटे बाहेर येते,तेव्हां नात्यातील संबंध दुरावले जातात माणूस रीकाम्या हाती जन्माला येतो व रीकाम्या हाती जातो.जन्माची निदान वेळकाळ तरी ठाऊक असते.पण जाण्याची वेळ अजून तरी ठरवली गेली नाही.मग का हा आतताई अहंकार ! देवाने दिलेलं सुंदर आयुष्य जगा की आनंदानी व दुसऱ्याला ही जगू द्या.

अती मानभावी व आक्रस्ताळी स्वभाव ही नात्याला लागलेली कीड आहे.सुंदर कलाकृतीचे लाकूड वाळविने पोखरून पोकळ करून टाकावे व एके दिवशी ती वास्तु किंवा ती कलाकृती कोलमडून खाली पडावी अन् अचानक आपल्याला जबरदस्त धक्का बसावा असे होते. मग ते नात मित्र-मैत्रिण,मित्र-मित्र,नवरा-बायको,आई-मुलगा,आई-मुलगी,नणंद-भावजय,बहीणी-बहीणी

बहीण-भाऊ, भाऊ-भाऊ, आजी-नातवंड, आजोबा-नातवंड, शेजारी-शेजारी कुठल ही असो.

माझ-तुझचे विष एकदा मनात प्रवेशकर्त झाल की विनाशाची वाट जवळच असते.तिला फार शोधाव लागत नाही.

कांही माणसांना तुमच्यातलं चांगल सहन होत नाही,तेव्हां ते तुमच्यातलं वाईट शोधायला सुरूवात करतात कलुषित मन हे कधी चांगला विचार करूच शकत नाही.सामजस्याने तोडगा काढण्याची वृत्ती लय पावत चाललेय.निसर्गातील दुषित वातावरण,समाजातील अनिष्ट दुष्ट प्रवृत्ती,धावपळी मुळे विस्कळीत झालेली जीवन शैली,रोगराईचा प्रार्दभाव,लोकसंख्या वाढ,गर्दी,तणावयुक्त आजुबाजुचा परीसर अशा कैक कारणाने सहनशक्तीचा अभाव होत चाललाय.या विशिष्ट परीस्थितीने रागाचा भडका उडून अनर्थ होतोय.हे थांबवाव कसे हा एक भेडसावणारा यक्ष प्रश्न,समोर आ वासून उभा राहतो.

नात्याला सुरूंग लागून नाती जमीनदोस्त होत चाललेत का ? असे क्षणभर वाटते.नाते टिकवून ठेवण्यापेक्षा नात्यापासून बंधमुक्त होण्याकडे कल वाढत जातोय का ? नाते म्हणजे,दोन प्रेमाच्या शब्दाने शब्दाला जोडला जाणारा जिव्हाळा असतो. त्यातून ऋणानुबंधाचे मधुर नात जन्मा येत.कधी ते निसर्गाशी,फुलांशी,झाडापानांशी,प्राण्यांशी ही होऊ शकत.

असच एक नात आई-मुलांच असत.सध्याच्या कलीयुगात ते जपणे फार कठीण झालेय.जेव्हां एखाद्या बाईचा नवरा अगर एखाद्या पुरुषाची पतकी दिवंगत




होते.विशेष करून उतारवयात ! तेव्हां ती बाई किंवा तो पुरुष स्वत:च्या दृष्टीने एकाकी पडलेले असतात. आयुष्यभर माया-ममतेने कुरवाळलेली लेकर व आयुष्याची काठी समजली जाणारी मुल जेव्हा तीला दुर्बिणीतू पाहु लागतात तेव्हा अंतरीच्या कळा तिला वेगळच काही तरी सांगून जातात.बालवयात विनोदात समरस होणाऱ्या मुलांतील साध्या,सरळ स्वभावात अमूलाग्र बदल घडलेला दिसून येतो.

माणूस हा हव्यासा पोटी माझ माझ करत असतो. तो हे विसरतो,आज ना उद्या सर्वांनाच जग सोडून जायचंय.जमा केलेली पुंजी कुणीच वर घेऊन जाऊ शकत नसतो.मग कशाला हा हव्यासाचा अट्टाहास ? आपल तुपल न करता एकत्रित जगू या की ! यातून प्रगल्भ विचारांची कमतरता व वैचारिक बैठक डळमळीत झालेली दिसून येते.

श्रीमती नीला पाटणकर
शिकागो, अमेरिका.

माणूस हा स्वार्थी आपमतलबी,आप्पलपोटी व स्वत: भोवती गिरक्या घेणाऱ्या माकडा सारखा असतो.केव्हा दुसऱ्यावर हल्ला करून कार्य साध्य करेल हे सांगता येत नाही. आत्मसन्मानीत वृत्तीचा स्वार्थी असतो.तो गुन्हेगारा सारखा दुसऱ्याला पिंजऱ्यात डांबण्याचा असुयी आनंद लुटत असतो. अहंकार हा भुंग्या प्रमाणे असतो.भुंगा फुलातील मधुरस शोषून घेतो.तसेच अहंकाराने बरबरटलेल्या नात्यातील गोडवा रसातळाला नेतो.

कुठुन येते ही अहंकाराची नात्यातील किड ? दिवसें दिवस माणूस आत्मकेंद्रित दृष्टीचा होऊ लागला आहे.पिढ्या न पिढ्या चालत आलेला हा वारसा आलेला असतो का ? तर याचे उत्तर नाही हेच आहे. कारण माणसाची जडण-घडन त्याच्या विशिष्ट अशा वाढलेल्या पोषक वातावरणावर आणि न कळत झालेल्या संस्कार मूल्यांवर अवलंबून असते.जशी जमीन तस पिक हे नैसर्गिकच आहे. न्यूनगंडातून येणारी मानसिकता फार भयानक व भयावह असते.वेळीच त्याला अटकाव करणे गरजेच असतं.दुसऱ्यातील चांगले गुण वा वस्तु आपल्याकडे नाही.ही भावना त्यांचे मन पोखरत असते.हे ओझे मनावर घेत ते वावरत असतात.हीच असंतुष्ट मानसिकता असंतुलनाकडे नेते. कारण ती त्यांच्या जन्माला चिकटलेली जळु असते.ती त्यांना अंधारातून रक्तबंबाळ करत असते.त्यांच्यात व्यक्त होण्याची क्रिया कमी असते,ते मनात सतत धुमसत राहत असतात.मनाचा झालेला कोंडमारा बरेचदा नकोत्या ठिकाणी व नको तेथे तो स्फोटका प्रमाणे बाहेर येतांना दिसतो.

अशा वेळी मनातील मळमळ हे लोक आरडा-ओरडा करून,किंचाळून,दुसऱ्याच्या अंगावर खेकसून बोलून आदळ-आपट करून दुसऱ्याच लक्ष स्वत:कडे केंद्रित करण्याचा आक्रस्ताळेपणाने प्रयतक करतात.हे एक विकृत मानसिकतेचे लक्षण असू शकते.पण बरेच वेळा ते दुर्लक्षित केले जाते. त्याचा परीणाम लहान पुळीचे मोठे गळु होण्यात होतो.त्याला वेळीच आळा घालणे उचित असते. शब्द हे काचेच्या घड्या सारखे असतात.एकदा घड्याला तडा गेल्यावर किती ही डागडुजी केली तरी पूर्ववत तो घडा एकसंध होत नाही.प्रयतक केला तरी खूणा आपले आस्तित्व मागे ठेऊन जातातच.

अंध जाणकारांच्या ते लक्षात येतच नाही.शब्द हे माणसाचं प्रभावी शस्त्र आहे. कांहीजण यात अचूक नेमबाजी करण्यात पटाईत असतात. दुसऱ्याची सकारात्मक गोष्ट वारंवार खटकणाऱ्या लोकांना वेळोवेळी त्याच्याशी स्वत:ची तुलना करण्याची सवय असते.त्यामुळे ते स्वत: या बाबतीत कधी समाधानी नसतात.परंतु एखादा तिच सकारात्मकता पाहुन स्वत: मधे सुधारणा करतो.व सांगणाऱ्याचे मनोमन आभार मानतो.तोच समाजात स्वत:ची उन्नती करतो.व कधीच मागे न पडता त्याचा उत्कर्षच होत राहतो. आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षणा पासून ते नोकरी पर्यंत प्रत्येक बाबतीत चढाओढीने पुढची पिढी त्रस्त झालेय.हे ग्रासलेल मनच नैराश्येचे मूळ कारण असते.नोकरी,व्यवसात मिळकतीचे प्रचंड वाढलेले आकडे माणसाला मनस्वास्थ्या पासून व निर्भेळ आनंदा पासून दूर खेचत दूर नेत आहेत.याचा विचार करायला ही त्यांचे जवळ अवसर नाही.याचा खेद वाटतो.अनुभवकर्त्याचे ते अनुभव ग्राह्य मानण्याचे मनोबल त्यांचेकडे नसते.ही चिंताजनक बाब आहे.

कधी कधी हसत खेळत केलेलं विधान सुध्दा गैर अर्थवाही घेतले जाते.कारण त्यांची वैचारिक बैठकच पोकळ पायावर उभी असते.ही दोलायमान स्थिती त्यांचा मेंदू पेलूच शकत नाही. अशा वेळी आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी ते आडमार्ग निवडतात.जसे आकांततांडव,कांगावा करून,दुसऱ्याला अपमानीत करून आपल म्हणणे पटवून देण्याचा असफल प्रयत्न करतांना दिसतात. त्या क्षणाला त्यांची सारासार विवेक बुध्दी नष्ट झालेली असते.कारण ते फक्त स्वत:वरच प्रेम करत असतात.

चांगुलपणा मिळवायला वेळ लागतो.हे कधीच त्यांचे ध्यानीमनी येत नाही.खत पाणी घातल्या शिवाय झाड डवरत नाही.व गोमटी फळ ही लगडत नाहीत.आधि हाताला चटके मग मिळते भाकर ! चांगुलपणा मागून मिळत नाही तो आपोआप आपसुक आपल्या पायाशी लोळण घेत येतो.व तोच खरा त्या व्यक्तीचा सन्मान असतो.चांगुलपणा आपल्या सतशील वागण्याची सच्ची पावती असते. ते काही इनस्टंट पिठाची इडली,मेदू वडे,गुलाबजाम करण्या इतक सोप नसत.पी हळद नी हो गोरी अस असूच शकत नाही.विजय नेहमी सत्याचा असतो. एवढी महत्वाची भावना जरी मनात ठेवली तरी पुरेसे आहे.मी,माझे,मला हेच शब्द त्यांना ठाऊक असतात.व याच शब्दा भोवती सतत गोंडा घोळत ते बसतात.मी चांगला,मीच शहाणी एवढेच शब्द त्यांच्या रोजनिशीत असतात. **(पान ४ वर)**

जागतिक योग दिनानिमित्ताने

# योग- आत्महत्या प्रतिबंध आणि ताणतणाव मुक्तीचा प्रभावी मार्ग


मानवी मेंदू हा आजच्या काळातील सुपरकॉम्प्युटरपेक्षा खूपच प्रगत अवयव आहे. जर कॉम्प्युटरमधे वायरस आला तर तो काढून टाकावा लागतो. तो काढला नाही तर कॉम्प्युटरमधला सगळा डेटाच 'करप्ट' होण्याची शक्यता निर्माण होते. मेंदुचे सुद्धा तसेच आहे. भ्रामक कल्पना डोक्यात शिरल्या तर डोकं योग्य पद्धतीने काम करीत नाही. भारतीय ऋषीमुनींना केवळ ध्यानाच्या माध्यमातून हे समजलं. त्यांनी तपश्चर्या करुन योगाच्या माध्यमातून मेंदूतील विचार भ्रामक झाले असतील किंवा हिंसक, कृर, दुखी किंवा आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतील इतके टोकाचे नकारात्मक झाले असेल तरी त्यावर मात करता येते हे जाणले. मेंदु शुद्ध, शांत पवित्र विचारांनी पुन्हा भरता येतो हे सिद्ध केले. वाल्याचा वाल्मिक ऋषी होणे, राजपुत्र सिद्धार्थचा गौतम बुद्ध होणे हे त्याचे काही उदाहरणे आहे.

डॉ. राजेंद्र निकुंभ
मो. ७५८८३१८७७७

आधुनिक जीवन इतके गतिमान झाले आहे की प्रत्येकाचीच हवे ते मिळवण्यासाठी धावाधाव आणि दमछाक होते. एवढे करुनही त्याला यश मिळेल असे नाही. उलट हवे ते मिळत नाही म्हणून वैफल्य येते. शेतक-यांच्या आत्महत्या, महिलांवरील हिंसाचारात वाढ झाल्यामुळे त्यांच्या आत्महत्या, पद, पैसे आणि प्रतिष्ठा असूनही नेते आणि अभिनेत्यांच्या आत्महत्या इतकेच काय शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना मोबाईल फोन वापरण्यावर बंधन आणले म्हणून रागावून जीवाचे बरेवाईट करणारे मुले, काही दिवसांपूर्वी तर आध्यात्मिक क्षेत्रात मोठे नाव असलेल्या एका महाराजांनी आत्महत्या केल्याचे समजले. याचा अर्थ बाबा, महाराज अन संतांच्या आयुष्यातही आता शांती राहिलेली नाही. प्रत्येकाच्या जीवनात काहीना काही दु:ख आहे. प्रत्येक जण वैफल्यग्रस्त आहे. प्रत्येकाचाच मेंदू कमी-अधिक प्रमाणात गोठलेला आहे. त्यावर गंज चढलेला आहे. आधुनिक वैद्यकीय शास्त्रात यावर कायमस्वरूपी आणि खात्रीशीर उपाय नाहीच. मात्र ताणाच्या व्यवस्थापनेसाठी, आत्महत्या टाळण्यासाठी आणि मन सुदृढ, सशक्त, शुद्ध

आणि निरोगी ठेवण्यासाठी योगाभ्यासात उपाय आहे. योगातील काही विशेष क्रीयांचा अभ्यास नियमीत केल्यास मानसिक शक्तीत निश्चितपणे वाढ होते. मन खंबीर होते. माणसाच्या मनातले नकारात्मक विचार निघुन जातात. मनाची सकारात्मकता वाढते, ताणाचे व्यवस्थापन होते.

मन-मस्तिष्कावर प्रभावी कार्य करणाऱ्या काही यौगिक शक्ति विकासक क्रीया, शुद्धीक्रीया, प्राणायाम




व ध्यान यासारख्या क्रीया फक्त काही मिनिटात करुन मनाला सक्रिय आणि सकारात्मक बनवता येते. मेंदुवर साचलेला गंज देखील काढून टाकता येतो. दैनंदीन योगाभ्यासाच्या सुरुवातीलाच अश्या यौगिक प्रक्रीयेंचा समावेश आपल्या योगाभ्यास केला तर वैफल्य नष्ट होउन आत्महत्ये सारखे चुकीचे विचार कधीही माणसाच्या मनाला शिवणार नाहीत. ताणाचे व्यवस्थापन आपोआप होईल. आयुष्यात आनंद निर्माण होईल.

योगी धीरेंद्र ब्रह्मचारी यांच्या शक्ती विकासक क्रिया मनाच्या या सूक्ष्म शक्तिमधे असलेले फरक ओळखतात आणि प्रत्येक शक्तिचा योग्य विकास व्हावा यासाठी वेगवेगळ्या क्रिया सुचवतात. ह्या शक्ती विकासक क्रिया मनाच्या आरोग्यासाठी खूप उपयुक्त आहेत. त्या शक्तिविकासक क्रीया जाणून घेऊया.

बुद्धी आणि संज्ञानात्मक शक्ती विकसित करणाऱ्या क्रिया म्हणजे बुद्धि तथा धृति शक्ति विकास क्रिया. उभे राहून मान वर करुन उंच आकाशात पहावे व शिखामंडल अर्थात शेंडीच्या ठीकाणी लक्ष केंद्रीत करुन २०-२५ वेळा गळ्यात घर्षण होइल अश्या पद्धतीने श्वास काहीसा जलद व दाबुन घेणे व सोडणे ही क्रीया केल्यास विस्मरण, गोंधळलेली मन:स्थिती नियंत्रणात येते. संयम शक्ती वाढते. मन सकारात्मक कामांमध्ये गुंतते. बुद्धीमत्ता ही अशी मानसिक शक्ती आहे जी वस्तू आणि तथ्ये समजून घेण्यास, त्यांच्यातील परस्परसंबंध शोधण्यास आणि तर्कसंगत ज्ञान प्राप्त करण्यास मदत करते. धृती, धारणशक्ती म्हणजे धैर्य. ध्येयावर दृढ आणि सतत लक्ष केंद्रित करण्याची क्षमता. धृतीशिवाय, मन त्याच्या निर्णयांवर ठाम राहू शकत नाही. परंतु या शक्तिविकासक क्रीयेमुळे मन निश्चल, सकारात्मक व निश्चयी होण्यास मदत होते.

स्मरणशक्ती विकासक क्रियेत मान सरळच ठेवावी. सहस्त्राहार चक्रावर लक्ष केंद्रीत करावे. आणि वरीलप्रमाणेच श्वास घेणे सोडणे करावे. असे केल्याने स्मरणशक्ती सुधारते. मानसिक थकवा दूर होतो.

मेधा शक्ती विकास क्रियेत मान खाली घालून हनुवटी कंठात रुतेल अशी ठेवावी. लक्ष मानेच्या मागील बाजूस मेधा चक्रावर स्थीर करावे आणि वरीलप्रमाणेच श्वास घेणे सोडणे करावे. यामुळे अतिरीक्त किंवा दुषीत वात, कफ आणि पित्त जमा झाले तर ते निघून जाते. मन तीक्ष्ण होते. मेधा स्थानातील कफ स्वच्छ होतो. 'मेधा' म्हणजे ज्ञान लक्षात ठेवण्याची, शिकण्याची आणि पुनर्वापर करण्याची क्षमता.

मन शांत करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे भ्रामरी प्राणायाम. ध्यानस्थ स्थितीत बसणे. शण्मुखी मुद्रेने हात डोळे, नाक, ओठ आणि कानावर ठेवावे. श्वास घेताना व सोडताना, भ्रमरनाद काढावा. मन:शांतीसाठी याचा फार उपयोग होतो.

जोरकस रेचक व सहज पुरक म्हणजे कपालभाती ही शुद्धीक्रीया आहे. कोणत्याही निरोगी व्यक्तीला त्याच्या तेजस्वी कपाळावरून ओळखता येते. ही क्रिया बुद्धी देखील स्वच्छ आणि तीक्ष्ण करते, ऊर्जा वाढवते. शेवटची क्रीया म्हणजे त्राटक. ध्यानस्थ स्थितीत बसुन दृष्टी आपल्या उंचीवर समोर एका बिंदुवर स्थीर करावी. एकटक बघत रहावे. पापण्यांची हालचाल सुद्धा करु नये. डोळ्यांत थकवा जाणवेल तेव्हा डोळे बंद करा आणि काही मिनिटे विश्रांती घ्या. एकाग्रता, मानसिक स्पष्टता, डोळ्यांचा थकवा कमी होणे, स्मरणशक्ती सुधारणे, आत्म- नियंत्रण वाढणे, ताण कमी होणे, नकारात्मक विचार दूर होणे हे त्राटकाचे फायदे आहेत.

या सगळ्या क्रीयेंचा एकत्रीत परीणाम मेंदूच्या आरोग्यावर होतो. संज्ञानात्मक कार्य, स्मरणशक्ती आणि मूड सुधारतो. लक्ष केंद्रित करण्याची क्षमता आणि जागरूकता वाढते. मेंदूच्या लहरींच्या क्रियाकलापांमध्ये बदल होतो, अल्फा, बीटा आणि थीटा ब्रेनवेव्हची क्रियाशीलता वाढते. खरेतर यावर योग क्षेत्रात कार्य करणा-या तरुण संशोधकांनी संशोधन करायला हवे. आधुनिक मानवजातीच्या आत्महत्या, नैराश्य, चिंता इत्यादी विविध मानसिक विकारांवर उपाय शोधण्यात ते यामुळे मदत करू शकतात. योग म्हणजे फक्त सामान्य जीवन जगतांना स्वास्थ्य प्राप्तीचा मार्ग न्हवे. योगाने बुद्धी प्रगल्भ होउन विवेक जागृत होतो. मनुष्य सुस्वभावी होतो. आत्म्हत्या, नैराश्य आदी नकारात्मक गोष्टी त्याच्या जवळ येउ शकत नाहीत. स्वत:चे व जनकल्याणाचे विचार मनात येतात. त्यालाच तर आत्मसाक्षात्कार म्हणतात. अश्या या सद्विवेक बुद्धी व प्रेरणेला जन्म देणारा योगाभ्यास सगळ्यांनी करावा व योगासारख्या परीस स्पर्शाने जीवनाचे सोने करावे ही शुभेच्छा.

# न्यूनत्व भावना



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

## आनंदी वाटचाल



प्रत्येक मनुष्याच्या मनात स्वतःला दुसऱ्याकडून मोठेपणा मिळावा आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ असावे अशी इच्छा असते ही इच्छा नेहमीच तृप्त होते असे नाही.उलट ती अतृप्त राहण्याचेच प्रसंग जास्त येतात .मनुष्याची गौरव इच्छा अनेक कारणांनी दुखावली जाते त्यापैकी काही शारीरिक आणि काही सामाजिक असतात. कोणत्याही कारणांनी दुसऱ्याकडून उपहास किंवा अपमान सहन करण्याचा प्रसंग आला की स्वतःच्या अंगी काहीतरी कमीपणा म्हणजे न्यून आहे अशी भावना मनुष्याच्या मनात निर्माण होते तिला न्यूनत्व भावना असे म्हणतात .

सामान्यतः लहान वयात म्हणजे ज्यावेळी मनुष्याची बुद्धी अपक्क आणि मन भावनाशील असते आणि इतरांनी केलेल्या निंदा स्तुतीचे परिणाम मनावर सहज होतात .अशा वयात न्यूनत्व भावना मनात रूजते आणि अंत जागृत बुद्धीत दबा धरून असते पण तिचे परिणाम मात्र दिसून आल्याशिवाय राहत नाही. मनात दडून बसलेल्या न्यूनत्व भावनेचे परिणाम बाह्यत फारच विचित्र दिसतात. ज्यांच्या मनात न्यूनत्व भावना असते ती मनुष्ये मनातल्या मनात प्रत्येक बाबतीत स्वतःची इतरांशी तुलना करीत असतात, आणि इतर लोक आपल्याकडे साशंक नजरेने किंवा उपहास बुद्धीने पाहत आहे की काय अशी भीती त्यांना वाटत असते, म्हणून आपला मोठेपणा लोकांच्या नजरेला कसा आणून देता येईल इकडे त्यांचे नेहमी लक्ष असते. स्वतःच्या अंगी खरा मोठेपणा नसला तरी दुसऱ्याचा उणेपणा शोधण्यात ते चूर असतात .दुसऱ्याची न्यून किंवा दोष दाखविण्यात त्यांना एक प्रकारचा आनंद आणि समाधान वाटते.जे खरोखर श्रेष्ठ असतात आणि ज्यांना आपल्या श्रेष्ठ पणाची खरी जाणीव असते त्यांना उठल्या सुटल्या आपला श्रेष्ठ पणा लोकांना दाखवण्याची जरुरी भासत नाही . न्यूनत्व भावनेचाआणखी एक परिणाम असा होतो की मनुष्य एकलकोंडे राहण्याचा प्रयतक करतो.पण असे केल्याने न्यूनत्व भावना नाहीशी होण्या ऐवजी मनात सतत जागृत राहते.न्यूनत्व भावनायुक्त मनुष्याचे विचार बहुधा स्वार्थी असतात. त्यांच्या मनातील ममत्व आणि अहंकार भावना वाढलेल्या असतात. न्यूनत्व भावनेचा परिणाम नेहमीच वाईट होतो असे नाही केव्हा केव्हा ती भावना मनुष्याला उच्चपणाला नेण्यास कारणीभूत होतात .मनात दबलेल्या अनिष्ट भावना दारूच्या कोठारा प्रमाणे असतात. त्यावर केव्हा कशी ठिणगी पडून त्यांचा स्फोट होईल याचा नेम नसतो.

थोडी बहुत न्यूनत्व भावना प्रत्येकात असे ती बेतात असली तर तिच्यापासून विशेष त्रास होत नाही.उलट केव्हा केव्हा ती उत्कर्षाला कारणीभूत होतेच. पण ती मर्यादे बाहेर गेली म्हणजे जीवनातील यशाच्या आणि सुखाच्या मार्गात धोंडे सारखी आडवी येते. मग ती नाहीशी केली नाही तर मनुष्याचे प्रगती खुंटते .त्याला अधोगतीला जाण्याचा धोका उत्पन्न होतो. त्याचे सुख नष्ट होते आणि यश गमावण्याची पाळी येते. तो स्वतः बरोबर इतरांचेही जीवन दुखी करतो ,म्हणून न्यूनत्व भावनेच्या अस्तित्वाची जाणीव झाल्याबरोबर ती शक्य तितक्या लवकर मनातून काढून टाकणे इष्ट आणि हितावह असते. न्यूनत्व भावना काढून टाकण्याचे तीन मार्ग आहेत पहिला मार्ग म्हणजे आपल्यात जे न्यून असेल त्याच्याशी समोरासमोर टक्कर देऊन शक्य काढून टाकावे पण सर्व प्रकारची न्यूने काढून टाकता येत नाही यासाठी एकाबाबतीतले न्यून भरून काढण्यासाठी दुसऱ्या कोणत्यातरी बाबतीत श्रेष्ठ पणा मिळवल्याने काम भागते .दुसऱ्या बाबतीतील श्रेष्ठत्वामुळे पहिली न्यूनत्व भावना आपोआप कमी होते. गरीबीमुळे एखाद्या विद्यार्थ्याला वाटणारी न्यूनत्व भावना अभ्यासात पहिला क्रमांक मिळवल्याने नाहीशी होते .या रीतिला न्यूनत्वाची भरपाई करण्याचे रीत असे म्हणतात.

न्यूनत्व भावना घालवण्याचा तिसरा आणि सर्वात उत्तम मार्ग म्हणजे अनासक्ती पूर्वक स्वतःच्या कर्तव्य कर्मात निमग्न राहण्याचा. पहिले दोन्ही मार्ग सर्वांना साधतीलच असा नेम नसतो पण अनासक्त कर्माचा मार्ग कोणालाही आचारता येण्यासारखा आहे आणि त्या मार्गापेक्षा श्रेष्ठ किंवा सुकर मार्ग कोणताही नाही. अनासक्ती पूर्वक आपले कर्तव्य कर्म सतत करीत राहणाऱ्याच्या मनात न्यूनत्व भावनेला मुळीच थारा मिळू शकत नाही असा निरपवाद अनुभव येतो अशाप्रकारे आपल्या मनातील न्यूनत्व भावनेचे निरसन करून सुखी जीवन जगण्याचा मार्ग आपल्याला यातून मिळू शकतो.

# पुस्तकदूत



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

## उमलत्या कळ्या



गंगापूरचेग्रंथालय फारच थोड्या गावकऱ्यांनामाहित होतं. तीस वर्षांपूर्वी सरकारी योजनेतून गावोगावी ग्रंथालय सुरुकरण्यात आली.तसंच एक ग्रंथालय गंगापूरमध्ये सुरु झाले होते.मात्र पुस्तके लोकांपर्यंत पोहचावीतकिंवा लोकांनी पुस्तके वाचावीत हा खरा आणि मूळ उद्देश्य कधीच मागे पडला होता. त्यापेक्षा आपल्या पतकीला ग्रंथपाल म्हणून नियुक्ती मिळेल, या हेतूने गंगापूरमधीलकाहीजणांनी ग्रंथालयासाठी आग्रह धरला होता. सरकारदरबारी खूप फेऱ्या मारल्यावर त्यातून एकाला यश आलं नि गंगापूरच्या ग्रंथालयाला मान्यता मिळाली. पुस्तकांची संख्या, वाचकांची संख्या, वर्गणीदार, अनिर्वाय सुविधा या किचकट निकषांमध्ये गंगापूरचे ग्रंथालय मागे पडले. शहरातील जुन्याग्रंथालयातून आणलेली पुस्तके अडगळीला पडली. जो कोणी पुस्तक न्यायचातो परत आणून देत नसे. पुस्तक देणे-घेण्याची नोंद नियमितपणे होत नसे. त्यामुळे ग्रंथालयाचा शिक्का असलेली पुस्तके गंगापूरच्या काही घरांमध्ये,कोणाच्या स्टूलवर, काही घरांच्या कोपऱ्यात, कोणाच्या कपाटात दिसायची.

आदित्यला कॉलेजच्या दुसऱ्या वर्षी एक प्रकल्प पूर्ण करायचा होता.त्याच्या प्रकल्पाचा विषय होता ग्रामीण कांदबरी. कॉलेजच्या ग्रंथालयामध्ये शोध घेतांना त्याला आठवलं की आपल्या गावातही छोटं ग्रंथालय आहे. त्यातकाही निवडक कांदबऱ्याशोधल्या तर आपला प्रकल्प अधिक साहित्यपूर्ण व संदर्भासहित होईल, म्हणून तो मोठ्या अधीरतेने घरी आला.ज्यांच्या घरी ग्रंथालयासाठी दोन कपाटे ठेवली होती तेथे तो गेला. आपली पुस्तकांची गरज सांगितल्यावर त्या घरातील वृद्ध आजोबा म्हणाले, ने बाबा, तुला लागतील ती पुस्तकं ने. कपाटउघडचं आहे. तूतरी ती पुस्तके वाच.

आदित्यला खूप आनंद झाला. त्याने दोन्ही कपाटातील पुस्तके पाहिली. सगळी पुस्तके अस्ताव्यस्त झाली होती. सर्वप्रथम त्याने त्या पुस्तकातून त्याला हवी असलेल्या ग्रामीण कांदबऱ्यांचा शोध घेतला. त्यात त्याला धग, गारुड, फकीरा, शितू, बनगरवाडी, बारोमास अशा काही कांदबऱ्या सापडल्या. कपाटात असलेल्या देव-घेवरजिस्टरमध्ये त्याने स्वत:च्या नावाची नोंद केली.निघतांना अस्ताव्यस्त झालेल्या पुस्तकांची व्यवस्थित मांडणी केली. पुढच्या वेळेस येऊ तेव्हा, या पुस्तकांचे कथा, कविता, ललित, कांदबरी, भाषांतरीत, अनुवादित अशाप्रकारे वर्गीकरण करून कपाटात व्यवस्थित लावू, असा विचार करून तो उठला. आजोबांना पुस्तके दाखवून त्याने निरोप घेतला.

प्रकल्पाच्या निमिताने आदित्य एक-एक कांदबरी वाचत होता. धग मधीलकथानकाने त्याच्या मनावर गारुड केलं होतं. मग संध्याकाळच्या वेळेस तो आपल्या मित्रांसोबत वाचलेल्या कांदबरीविषयी भरभरून बोलायचा. मित्र त्याचे बोलणे मनापासून ऐकायचे. मनातल्या शंका विचारायचे.आदित्य मगअधिक सखोलपणे वर्णन करायचा.

एक दिवस आदित्य व्यंकटेश माडगुळकर यांच्या बनगरवाडीविषयी असाच भरभरून बोलत होता. कांदबरीतलं वर्णन ऐकून आदित्यचा मित्र वैभव म्हणाला, मलाही दे रे एक पुस्तक वाचायला!

नक्कीदेईन. आदित्य म्हणाला.

चार सहा दिवसानंतर मित्रांच्या गप्पा खूपच रंगल्या. वैभव त्याने वाचलेल्या पुस्तकाचे वर्णन करत होता.

वैभव,आता तू जे काही सांगितलस, त्यामुळे मला प्रकल्पाचे लेखन करतांना सोपं जाईल. आदित्य म्हणाला.

मी हे पुस्तक येत्या दोन दिवसात वाचून पूर्ण करणार आहे. वाचतांना डोळ्यासमोर चित्र उभं करणंआणि त्यात रमून जाणं हा भारीच अनुभव आहे. मला आवडतं असं कल्पनेत रमायला. वैभव म्हणाला.

मी तुझ्यासाठी आणखी एक पुस्तक निवडून ठेवीन. वाचलेल्या पुस्तकांविषयी आपण चर्चा करू. आदित्यने सांगितलं.

काय रे! तुम्ही दोघेच पुस्तके वाचणार आणि तुम्ही दोघेच बोलणार याला काय अर्थ आहे? आम्हालाही एक-एक पुस्तक वाचायला द्या. मित्रमंडळी बोलायला लागली.

अरे! ही तर किती चांगली गोष्ट आहे! अशामुळे तरमाझा प्रकल्प संपूर्ण महाविद्यालयातभारी होईल. आदित्यटाळी वाजवत म्हणाला.

आदित्य, मला एखादं छोटसं, कमी पानांचं, कविता असलेलं पुस्तक देशील का? रघुने विचारले.

नक्की देईन. आपल्या गावातील ग्रंथालयाच्या कपाटात भरपूर पुस्तके आहेत. नाटकांचीसुद्धा पुस्तके आहेत. आदित्यने सांगितले.

मग त्या दिवसापासून आदित्यने पुस्तकांची अदलाबदल कशी करायची, याचे नियोजन केले. आपल्यालाआवडलेल्या पुस्तकाचीशिफारस मित्रांना करायची. आवडलेलं पुस्तक इतर मित्रांना वाचण्यास आग्रह करायचा, असं ठरवलं.

एके दिवशी वैभवला सोबत घेऊन आदित्यने ग्रंथालयाची सर्व पुस्तके मोजली. त्यांची साहित्य प्रकारानुसार जमेल तसे वर्गीकरण केले. पुस्तकेपुन्हा कपाटात व्यवस्थित ठेवली. रघुसाठी कुसुमाग्रज यांचा कवितासंग्रह आवर्जून घेतला.

परीक्षा जवळ येऊन ठेपली होती. शिवाय प्रकल्पही पूर्ण करायचा होता. आदित्यप्रकल्प लेखनाच्या कामात व्यस्त होता, तेव्हा त्याचे मित्र सवड मिळेल तसे पुस्तक वाचनात दंग असायचे. आपण वाचलेल्या पुस्तकाविषयी सर्वांसमोर कधी बोलतोय, अशी हुरहूर नव्या वाचकांच्या मनात निर्माण झाली होती.

घरातील मोठी माणसे या नव्या वाचकांचे कौतुक करायचे. काय वाचतोयस? पुस्तकाचे लेखक कोण आहेत?असे प्रश्न विचारायचे. घरी कोणी पाहुणे आले तर मुलांच्या हातातील पुस्तक पाहून ते नवल करीत.

संध्याकाळची वेळ ही सगळ्यांनी एकत्र येण्याची ठरलेली होती. कधी पारावर तर कशी देवळाच्या कठड्यावर तर कधी रस्त्याकडेच्या मोरवीवर! परीक्षेचा हंगाम संपला तशी वाचक मंडळी एकत्र आली. वैभवनेबारोमास वाचली होती. आदित्यनेपालापाचोळा वाचली होती. सुरुवात आदित्यने केली. सूर्य मावळतीला जात होता. रघुनेकणा कविता तोंडपाठ म्हणून दाखवली. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. आपलं झालेलं कौतुक बघून रघुला खूप आनंद झाला. तो म्हणाला, मला कविता वाचायला खूप आवडतात.

गावातील सुरेशदादा रस्त्यातून जातांना थबकले. टाळ्यांचा आवाज ऐकून वाचक मंडळीकडे वळले. आदित्यने हातातले पुस्तक दाखवले.

पोरांनो! असं काहीतरी चांगलं काम करा. तुम्ही जे काही करताय ते पाहून फार बरं वाटलं. तुम्हाला काही अडचण आली तर मला सांगा, सुरेशदादाने सर्वांचे कौतुक केले.

नक्की सांगू. वैभव म्हणाला.

आपण वाचलेल्या पुस्तकातील काही गोष्टी आपण आपल्या घरातील लहान-मोठ्या माणसांना ऐकवायच्या. कशी वाटते आयडिया? आदित्यने विचारले.

मस्त आयडिया आहे तुझी! रघु म्हणाला.

घरच्यांना गोष्टी ऐकून पुस्तक वाचावासं वाटलं तर? वैभवने विचारले.

आपण त्यांना पुस्तकं आलटून-पालटून देत राहू. आपल्यापेक्षा कपाटातील पुस्तकांना खूप आनंद होईल. ती बिचारी कपाटातच कोंडून राहिली आहेत.

आदित्यच्या बोलण्यावर सगळेजण खो-खो हसू लागले.

# भविष्य घडविण्यासाठी तरुणाईसाठी यशाचा मंत्र



आयुष्य कोणालाही दुसरी संधी हमखास देत नाही. इथे प्रत्येक निर्णय, प्रत्येक सवय आणि प्रत्येक क्षण तुमचं भविष्य घडवत असतो. आज जे दुर्लक्षित कराल, तेच उद्या पश्चात्ताप बनून तुमच्यासमोर उभं राहील.

१. सकाळी लवकर उठा. ही फक्त सवय नाही, तर यशाची पहिली पायरी आहे. जो दिवसाला जिंकतो, तो आयुष्यालाही जिंकतो. २. सोशल मीडियावरील चमकधमक पाहून स्वतःची किंमत कमी करू नका. तिथे लोक यश दाखवतात, संघर्ष नाही. ३. मित्रांची संख्या नव्हे, गुणवत्ता महत्त्वाची आहे. गर्दी तुमच्यासोबत चालू शकते, पण संकटात खांदा फक्त खरे मित्रच देतात. ४. शरीर आणि मन दोन्ही तंदुरुस्त ठेवा. मजबूत शरीर आत्मविश्वास देते आणि मजबूत मन कोणतीही लढाई जिंकू शकते. ५. प्रत्येक नकाराला अपमान समजू नका. अनेकदा बंद झालेला दरवाजा तुम्हाला योग्य दिशेकडे वळवत असतो. ६. नात्यांमध्ये प्रेमापेक्षा आदराला जास्त महत्त्व द्या. आदर नसलेल्या प्रेमाचं आयुष्य फार मोठं नसतं. ७. वेळेचं भान ठेवा. वक्तशीरपणा ही यशस्वी लोकांची ओळख असते. ८. दिसण्यासाठी जगू नका. कर्ज काढून प्रतिष्ठा विकत घेता येते, पण मनः शांती नाही. ९. तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवा. राग, मत्सर आणि भीती यांना दिशा द्या; त्यांना तुमच्यावर राज्य करू देऊ नका. १०. प्रत्येक चमकणारी गोष्ट मौल्यवान नसते. संधी, लोक आणि निर्णय यांची पारख करायला शिका. ११. चूक झाली तर ती मान्य करा. माफ करा म्हणण्यासाठी मोठेपणा लागतो. १२. शिकणं कधीही थांबवू नका. पदवी मिळाल्यावर शिक्षण संपत नाही; खरं शिक्षण तेव्हाच सुरू होतं. १३. फोनचा वापर करा, त्याचा गुलाम बनू नका. तुमच्या आयुष्याचं नियंत्रण नोटिफिकेशन्सकडे देऊ नका. १४. तुलना टाळा. प्रत्येकाचा प्रवास वेगळा असतो. तुलना आत्मविश्वास कमी करते. १५. पैशाचा हिशेब ठेवा. कमाई वाढवण्याइतकंच खर्च समजून घेणं महत्त्वाचं आहे. १६. स्वतःसोबत वेळ घालवायला शिका. जो स्वतःला समजतो, तो जगालाही अधिक चांगलं समजू शकतो. १७. रागात निर्णय घेऊ नका. एका मिनिटाची शांतता अनेक वर्षांची नाती वाचवू शकते. १८. दुसऱ्यांच्या चुका मोजण्यात वेळ घालवू नका. स्वतःला घडवण्यात ऊर्जा खर्च करा. १९. अपयशाला घाबरू नका. अपयश म्हणजे शेवट नव्हे; ते यशाकडे जाणाऱ्या मार्गावरील शिकवण असते. २०. कठीण कामांपासून पळू नका. वाढ नेहमी कम्फर्ट झोनच्या बाहेर मिळते. २१. नेटवर्क तयार करा, पण स्वाभिमान गमावू नका. आदर कमवावा लागतो, मागून मिळत नाही. २२. दिलेला शब्द पाळा. पैसा गमावला तर परत मिळू शकतो, पण विश्वास गमावला तर कठीण असतं. २३. मानसिक आरोग्याची काळजी घ्या. मन मजबूत असेल तर कोणतंही वादळ तुम्हाला हरवू शकत नाही. २४. सर्वांना खूश करण्याचा प्रयतक करू नका. जो सर्वांचा होतो, तो अनेकदा स्वतःचाच राहत नाही. २५. वयाच्या वर्षांपर्यंत इतकं नक्की समजून घ्या

पैसा हे साधन आहे, ध्येय नाही., नाती ही गुंतवणूक आहेत, ओझं नाहीत., वेळ ही जगा-तील सर्वात मौल्यवान संपत्ती आहे., शिकणं कधीही थांबत नाही., नम्रता ही कमजोरी नव्हे, तर खऱ्या ताकदीची निशाणी आहे., अपयश हा शेवट नाही; तो नव्या सुरुवातीचा इशारा आहे., स्वाभिमान कोणत्याही नात्यापेक्षा मोठा असतो., आणि शिस्त ही प्रेरणेपेक्षा हजारपट जास्त शक्तिशाली असते.

लक्षात ठेवा आयुष्य कठीण आहे, पण अन्यायकारक नाही. ते प्रत्येकाला त्याच्या प्रयतकांनुसार फळ देते. स्वतःवर विजय मिळवणारा माणूसच जगावर प्रभाव टाकू शकतो.

स्वप्न मोठी ठेवा, मेहनत प्रामाणिक ठेवा, विचार सकारात्मक ठेवा आणि पावलं थांबू देऊ नका. कारण यश त्यांनाच मिळतं जे परिस्थितीची वाट न पाहता स्वतःची वाट तयार करतात.

**जय हिंद....**

रामचंद्र कबाडी (आर्मी)

# ‘मी’ पणाचा त्याग सुखी जीवनाची गुरुकिल्ली

(पान ३ वरुन) बिनबुडाचे अव्यवहारी बालंट करून,आरोप प्रत्यारोपांच्या फैऱ्या झोडून मी कसा श्रेष्ठ आहे हे दाखवता येत नाही.असा माणूस स्वत: कधी सुखी होत नाही.आपण कुणाचं काम केल.मदत केली किंवा घरात आपल्या माणसांसाठी कांही केल तर त्यांचे आपण नोकर होत नाही.खर ते पुण्याच काम असते.तसेच ते आपले कर्तव्य ही असते.असे समजले तर सगळ्यांनाच मनशांती मिळुन जगणं सुसह्य होत.त्यात काही कमीपणाची भावनाच असू शकत नाही.ज्येष्ठांचा आदर करणे,आपुलकीने वागवणे,त्यांचे आशिर्वाद घेणे.हे संस्कार असावे.असे करण्याने तोटा काहीच होत नाही.झाला तर फायदाच होतो. जीवनाला उभारी येण्यास योग्य संस्कार कामी येतात.व त्याची आज कमरता भासत आहे.कारण पाल्यांकडे तेवढ लक्ष द्यायला पालकांना वेळच नसतो.त्याकरीता पैसे देऊन बाहेर संस्कार वर्ग आहेतच की,अशा भ्रामक कल्पनेत ते वावरत असतात.सध्या पैसे देऊन संस्कार विकत घेण्याचे, संस्कार वर्गाचे मोठ्या प्रमाणात पेव फुटल आहेच की !

स्वत:चे आस्तित्व सिध्द करण्यास पात्रता,हिंमत,मनाचा मोठेपणा,अपार कष्ट करावे लागतात.ते करून जो चांगुलपणा प्राप्त होतो तो घट्ट मजबूत खोल जमीनीत पाळे-मुळे रूतलेल्या वृक्षा सारखा असतो.तो कधीच डळमळुन उन्मळुन पडत नाही.तो प्राप्त करायला उभा जन्म खर्ची करावा लागतो.हे बालपणीच्या बीजांकुरा वर अवलंबून असते. घडोघडी कौतुकाची अपेक्षा करणे हा काहींचा स्वभावधर्म असतो.तसे नाही झाले तर इतरेत्रांवर गुणदोषांचा वर्षाव केला जातो.समोरच्या साध्या सरळ व्यक्तीला ते कळत सुध्दा नाही.हे एकाएकी काय झाले ते ! ती व्यक्ती आवाक होऊन विचारात पडते.

ओरबाडून घेतलेला आनंद व सुख चिरकाल टिकत नसते.गुणवत्तेनुसार मिळालेल सुख,आनंद वा इतर ही कुठला मानमराबत चिरंतन असतो.असा अनुभव फक्त १० टक्के लोक घेऊ शकतात.बाकीचे तारेवर लटकणाऱ्या पक्षाप्रमाणे असतात.मागून घेतलेली कुठली ही गोष्ट क्षणभंगुर असते. आपल्या गुणांची जोपासना कशी करायची हे त्यांच्या लेखी नसत.त्या बाबतीत ते अनभिज्ञ असतात. कर्वे,महादेवराव रानडे,फुले यांनी व अनेक समाजसुधारकाने शिक्षणाचे धडे दिले ते काय उर्मट व उध्दट व्हायला दिले नव्हते.शिक्षणाने सुसंस्कृत,सुविचारी होऊन समाजात,देशा

परदेशात नाव कमवा.मानसन्मान मिळवा. स्वत:ची आणि दुसऱ्याची उन्नती करा.संशोधनात प्राविण्य मिळवा.हाच सोज्वळ हेतू होता.

हल्ली प्रेम भावनेला उतरती कळा लागल्यामुळे,नात्यात अहंम,दुजाभाव,व्यवहाराचे लोण अतिवेगाने पसरत आहे.नात्याला प्रेमाची,आपुलकीची झालर लावली की नात हवेवर तरंगत,लहरत राहत.पण या सुखद अनुभवाला काही जण पारखे होऊन कक्षा सिमित होत चालल्यात.त्यात इंद्रधनुचे रंग भरून समाधान उपभोगण्या ऐवजी दुसऱ्यातील अवगुण दाखवून ती किंवा तो माझ्यापेक्षा कसा वाईट आहे.असे दाखविण्याची इर्षा वाढीस लागलेय.हे विचार बळावल्यामुळे ती व्यक्ती स्वत:लाच खड्ड्यात पाडून घेत असते.

काहींना,काही प्रसंगी अतीप्रमाणात निरर्थक बडबड करून समोरच्याला बेजार करण्यात मजा येते.कारण ती व्यक्ती त्याच्या दृष्टीने निर्बुद्ध असते.त्याला अविचल करून,आपण मनांतील भडस,जळजळ बाहेर काढून मन मोकळे केले असे दर्शवून कुरवाळले जाते.खर तर भाषेद्वारे व्यक्त झालेली त्यांच्या स्वभावातील विचारांची ही मानसिक अविचारी नीच प्रवृत्ती असते.

एखाद्या शांत,निर्मळ व्यक्ती पद्दल जसे रानातल्या फुलांना हारात स्थान मिळत नाही असे कटाक्षाने सुचीत करून,त्यांच्या मनांत भिनवण्याचा प्रयतक केला जातो.हे कोण ठरविणारे? कोणी कस जगायचं ते ? येथेच त्यांची आत्मकेंद्रित मनोवृत्ती निदर्शनास येते. हा मीचा वळवळणारा किडा त्यांना स्वस्थ बसून देत नाही. आत्मविश्वासाचा दिवा कायम जळत ठेवला की प्रकाशरुपी शांती,समृध्दी व हिंमत हे दिवे प्रज्वलित होतात.वार करणाऱ्याला माहीत नसत आपण किती खोल जखम केलेय.वरून जखम भरलेली दिसली तरी ती मनात आरपार रूतलेली ओली असू शकते. जो माणूस थोडा कालावधी साठी,धैर्य ठेवू शकत नाही तो आयुष्यात कधी ही पुढे जाऊ शकत नाही.धैर्य व स्थैर्य हे जीवनाचे सार आहे. जी मन हळवी असतात त्यांची मने शब्दांनी मोडली जातात.अन शब्द असतात जादुगर ज्यांनी माणसे जोडली जातात.आपल सुख कशात आहे हे शोधून प्रयतक करणे जास्त योग्य ठरते.

लिहीलेला प्रत्येक शब्द वाचणाऱ्या व्यक्तीला समजेल,आवडेल,पचनी पडेल अस काही नाही.लिहीणारा त्याची भावना,विचार लिहीतो आणि वाचणारा फक्त शब्द वाचतो.तेव्हां हे समजून घेतल तर कोणीच परक होत नसत.पण त्याचीच अनाठायी चिकीत्सा केली तर कुणीच आपले होत नाही.माणसाच्या मनात प्रेम,मुखात गोडवा वागण्यात नम्रता,हृदयात आपुलकीची जाण असली की बाकी सगळ कस आपसुक छान होत जात. शब्दांमुळे दंगल शब्दामुळे मंगल होऊ शकत,म्हणून तर जीभेवर ताबा ठेवण गरजेच असत.निसर्ग चेहरा देतो.पण आपली ओळख आपण निर्माण करायची असते. दूध, दह्यापासून लोणी ते तूप होण्यास अनेक टप्प्यातून कष्ट घेत पुढे जावे लागते. हा सृष्टीचा नियम आहे.

या लिखाणाच्या उहापोहाचा रोख कुणावर दोषारोप करण्याचा नसून,सर्वसामान्या पर्यंत कांही अंशी सद्य परिस्थिती पोहोचविण्या करीता घेतलेला हा आढावा आहे.इतकाच या मागचा प्रामाणिक हेतू आहे.सुधारणा झाली तर समाजात बोकाळलेल्या अनेक अपप्रवृत्तीला आळा बसण्यास मदत होईल.व पुढील पिढी साठी उपयुक्त ठरून पोषक नीतीमूल्य रूजतील एवढाच प्रामाणिक मानस आहे.मनाच्या तळमळीतून हळहळ वाटून मत व्यक्त केलेय.कदाचित कुणाला कडक शब्दात केलेले हे विधान वाटू शकेल.ज्यांना जे रूचेल व शक्य वाटेल त्यानी ते घ्यावे.न पटल्यास बिनदिक्कत सोडून द्यावे. आगीत होरपळलेल मन व सोसलेल्या झळा आणि काटेरी झुडपात ओरखडलेल शरीर कधीच स्वस्थ बसू देत नाही.कारण त्याला आगीची ज्वाळा व बोचणारे काटे सललेले असतात. ते अनुभवातून आलेल शहाणपण असत. तणाव ओळखून आपल्या अमूल्य कला,छंद,वेळेचं नियोजन आणि संवर्धन करून निरामय जीवन जतन करण्याकडे झुकत माप दिल तर निर्भेळ आनंदाची परीपूर्ती होऊ शकते.पैसा,संपत्तीचा वारेमाप संचय केल्याने संपत्तीचा माज येतो.तो काबूत ठेवणे प्राप्त ठरते.एकदां का पैशाची नशा चढली की ती नशा मद्या पेक्षा ही बेधुंद करते.पाय जमिनीवर न राहता माणूस हवेत भ्रमण करू लागतो.व एक दिवस वाऱ्याच्या झोताने जमिनीवर तोंडघशी पडतो.हे सूज्ञांनी लक्षात ठेवणे खूप गरजेचे आहे.माणूस हा माणूस राहात नाही.तो यशाने व पैशाने भूत पिशाच्च होतो.

जगायचं कस ते कळल पाहीजे.नियमितपणाच्या प्रामाणिक आचरणाने,खोट्याचा आधार घ्यावा लागत नाही.सात्विक आहाराने सुदृढ आरोग्य मिळू शकते तसे चांगल ज्ञान,निसर्ग विहार,हसत खेळत राहील्याने रागावर नियंत्रण करता येते.मी मीचा पाढा,आत्मल्शाघा तणाव मुक्त करू शकत नाही.ईश्वराप्रती लीन होऊन,जीवनाच्या व्यासपिठाचे मंदीर झाल पाहीजे. सौंदर्य दृष्टी ठेवली की आपोआपच नजरेत सगळच छान,छान दिसू लागत व वाटु लागत.वातावरण तणाव मुक्त असेल तर मानसिकतेला स्थैर्य मिळुन मनाचे संतुलन न ढासळणाऱ्यास मदत होते.हा समतोल राखणे अत्यंत निकडीचं असते.हे विनामूल्य आहे पण हेच सर्वात मौल्यवान आहे. आपल्याला कांही मिळवायचं असेल तर आपल्याला कांही द्यावं लागत.स्वत:ला सिध्द करून दाखवाव लागत.स्वत:च्या चूकांचा दोष दुसऱ्याच्या माथी मारण्याची बऱ्याच लोकांना सवय असते.नाती लादलेले न वाटता,ती नात्यांची वीण कशी विणायची हे पाहणे योग्य ठरते.

तुम्ही स्वत:कडे कस बघता यावर तुमच आयुष्य अवलंबून असत. नशिबाला दोष न देता,स्वत:ला घडवायच असत. दुसऱ्याच्या दारात सुखाचे झाड लावले की आपोआप आपल्या दारात आनंदाची फुले पडतात. म्हणूनच दु:ख सोडून द्यावे म्हणजे ते निर्माल्य बनून जाते. आनंद पेरीत गेले,की समाधान आपसुक आपल्या मागे येते. शेवटी मी,माझाचा पाढा किती व किती काळ गिरवायचा आणि त्यातून कसे अलिप्त राहायच हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. कारण प्रत्येकाच ते ज्याच त्याच जीवन असत.

# खानदेशातील समाज सुधारक आणि समाजसेवक



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

**माझा खान्देश**

खानदेशात समाज परिवर्तनाच्या क्षेत्रात समाज सुधारकांनी दिलेले योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. खानदेशात तत्कालीन समाजात असलेल्या समाजातील अनिष्ट रूढी-परंपरा,अंधश्रद्धा, अस्पृश्यता निवारण, सामाजिक क्षेत्रात भरीव असे योगदान समाज सुधारक व समाजसेवकांनी दिलेले आहे.

### पश्चिम खानदेशचे कर्मवीर अर्थात दादासाहेब डॉ. पांडुरंग राजाराम घोगरे-

पश्चिम खानदेशातील दलित, बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी दादासाहेब डॉ. घोगरे यांनी वाहून घेऊन सेवाभावनेने कार्य केले. म्हणून 'पश्चिम खानदेशचे कर्मवीर' या नावाने जनता त्यांना संबोधत असे. खानदेशातील एक वैद्यकीय पदवीधर असूनही व्यक्तिगत स्वार्थ, फायदा याकडे न पाहता, डॉ. घोगरे यांनी सर्वसामान्यांना चांगली आरोग्यसेवा दिली. पश्चिम खानदेशातील शहादा भागातील प्लेगच्या साथीला रोखण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. या सेवाकार्यात जातीभेदाचा कटू अनुभव त्यांना कायमचाच होता. धुळ्याच्या 'दत्तभक्त बाळगोपाळ मंडळ' या संस्थेच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविले जात असताना अस्पृश्यांना सहभागी होऊ दिले जात नसे. यामुळे दादासाहेब घोगरेंनी सनातनी विरोधकांना विरोध करून आपली हरिजनांबद्दलची भूमिका स्पष्ट केली. यातून त्यांच्यावर जाती बहिष्काराचा सामना करावा लागला. सर्व मानव जात एक आहे, सर्वांना समान अधिकार मिळाला पाहिजे, जाती-जातींमध्ये विभागलेल्या दलित-पीडित, उपेक्षित,वंचित घटकांसाठी दादासाहेबांनी जीवनाच्या अखेरपर्यंत कार्य केले. अस्पृश्यांना माणुसकीची वागणूक दिली जावी. हा त्यांचा आग्रह जीवनाच्या शेवटपर्यंत राहिला. यामुळे सनातन्यांच्या बहिष्काराला त्यांना तोंड द्यावे लागले. या सवर्ण हिंदुच्या अन्याय्य धोरणाचा तिटकारा येऊन दादासाहेब घोगरे यांनी धुळे येथील ख्रिश्चन चर्चमध्ये जाऊन ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याचे ठरविले. त्यांच्या धर्मपतकी सौ. पार्वतीबाई आणि काकासाहेब बर्वे यांनी दादासाहेबांना समजून सांगितले, चर्चमधील फादरच्या भूमिकेमुळे दादासाहेबांनी धर्मातराचा विचार सोडून दिला.

अस्पृश्यता निवारण कार्यात काकासाहेब बर्वेंच्या सहकार्याने दादासाहेब घोगरे यांनी सक्रिय सहभाग दिला. होणाऱ्या विरोधाला न जुमानता आपले कार्य सुरू ठेवले. हरिजन सेवक संघाच्या कार्यात त्यांचे योगदान चांगले राहिले.

दाजीसाहेब सौंदाणकर, नारायणराव चव्हाण गुरुजी, कुंभार गुरुजी आणि दादासाहेब डॉ. पी.आर घोगरे यांनी पश्चिम खानदेशात सत्यशोधक समाजाची स्थापना करून गावोगावी व्याख्याने देऊन सामाजिक जागृती घेऊन आणण्याची मोहीम काढली १५ ऑक्टोबर १९२६ रोजी धुळे येथील आपले निवासस्थानी 'कायस्थ पोट भेद विध्वंसक संघ' स्थापन करण्याची योजना त्यांनी आखली. लग्नात निरर्थक खर्च टाळावा, मृत माणसाच्या उत्तरकार्याचा खर्च टाळावा, हुंडा देणे टाळावे, प्राथमिक शिक्षण लवकर तालुक्यात सुरू करावे, मद्यपानाचा त्याग करावा हे ठराव डॉ.दादासाहेब घोगरे यांनी त्याकाळी केले. तळागाळातल्या लोकांच्या समस्या सोडवण्याचा प्रयतक त्यांनी शेवटपर्यंत केला.

### अॅड.वासुदेव विठ्ठल दास्ताने उपाख्य अण्णासाहेब दास्ताने

अण्णासाहेब दास्ताने यांनी अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य सुरू केले होते. धुळ्याच्या तुरुंगवासानंतर हरिजन सेवा संघाच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. पश्चिम खानदेशातील हरिजन सेवक संघाच्या कार्यकर्त्याप्रमाणेच पूर्व खानदेशातही अण्णासाहेब दास्ताने सक्रिय राहिले. अखिल भारतीय हरिजन सेवक संघाचे सदस्यत्व त्यांना देण्यात आल्यावर भुसावळ शहरात हरिजन सेवक संघाची शाखा त्यांनी सुरू केली. अण्णासाहेब दास्ताने महात्मा गांधीजींचे अनुयायी म्हणून सर्व दूर परिचित आहेत.महात्मा गांधी, विनोबा भावे, खान अब्दुल गफारखान, सेनापती बापट यांचा सहवास त्यांना लाभला. पूर्व खानदेशातील सामाजिक सुधारणा चळवळीत अण्णासाहेब दास्ताने या थोर सेवकाचे योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. स्वातंत्र्य आंदोलन प्रभावीपणे सुरू असतांना अण्णासाहेब दास्ताने यांनी दलित, असहाय्य जनतेच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले. समाजातील दुःखे दूर करण्यासाठी अहोरात्र परिश्रम केलेत. खानदेशातील समाजसुधारणा कार्यात अग्रभागी राहून महत्त्वाची भूमिका बजावली.

वकिलीतून लोकसेवाकार्यात अण्णासाहेब दास्ताने यांनी लक्ष घालून अडिअडचणीत असलेल्या लोकांना, मित्रांना शक्य ते सहकार्य दिले. या त्यांच्या गुणांमुळे त्यांना सार्वजनिक कार्याची ओढ लागली. अण्णासाहेब दास्ताने यांनी भुसावळ येथे वकिली व्यवसाय करीत असतात यावल , मुक्ताईनगर, जळगाव, अमळनेर, वरणगाव, जामनेर, रावेर, मलकापूर अशा शहरांशी वकिली निमित्त संपर्क ठेवून आपल्या प्रेमळ स्वभावातून माणसे जोडली. 'मित्र संघ' ही तरुणांची संघटनाही त्यांनी उभारली.महात्मा गांधींच्या विधायक चळवळीत सहभागी होऊन, काँग्रेस पक्षाच्या राजकारणात ते सक्रिय राहिलेत. 'खादी प्रचार आणि महाराष्ट्र चरखा संघ' चळवळीत अण्णांनी वाहून घेतले. खादी प्रचार कार्यातून हिंदू-मुस्लीम ऐक्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. पूर्व खानदेशात गावोगावी प्रचार करून प्रदर्शने भरविली. श्री. अण्णासाहेब सोनाळकर, मुन्शी मीर शुक्रुल्लाह, राजमल लखीचंद शेठ या सहकाऱ्यांच्या मदतीने पूर्व खानदेशात 'खादी व ग्रामोद्योग' उत्पादन प्रचार कार्य सुरू ठेवले. विधायक कृती कार्यक्रमातून जनतेच्या उन्नतीसाठी पुढाकार घेतला.




१९२४ साली जळगाव जवळील 'कडगाव' येथे उद्योगमंदीर (आश्रम) सुरू केले. आपल्या पतकीसह तेथे वास्तव्य करून खादी कार्य सुरू केले. सौ. वारूताई दास्ताने यांनी अण्णांच्या बरोबरीने त्यांच्या सामाजिक कार्यात चांगली साथ दिली. कडगाव आश्रम हे परिसरातील लोकांच्या मदतीचे आणि मार्गदर्शनाचे एक केंद्र बनले. अस्पृश्यता निवारण, हिंदू-मुस्लीम ऐक्य, दारुबंदी या सारख्या विधायक उपक्रमांच्या माध्यमाने अण्णांनी सामाजिक सुधारणा कार्यात लक्ष घातले. स्त्री वर्गाच्या उन्नतीसाठी प्रयतक केले. मंदिर प्रवेश मोहिमेत गावोगावी हिंडून सवर्ण मंडळीचे सहकार्य मिळविले. यातून कार्यकर्ते जोडलेत.

स्वतः कुष्ठरोगाने ग्रस्त झाल्यावर व त्यातून स्वतःला सावरल्यावर त्यांनी कुष्ठरोगाच्या उच्चाटनासाठी जागृती घडवून आणली.समाजातील या रोगाबद्दलचे गैरसमज दूर करण्यासाठी अहोरात्र परिश्रम त्यांनी घेतलेत. 'मिशनरी वृत्तीचे कुष्ठ सेवक' अण्णासाहेब दास्ताने यांनी 'कुष्ठरोगी हा अपराधी नसून त्याचे मनोधैर्य टिकविले तर तो आजारातून लवकर बरा होतो' हे आग्रहपूर्वक सांगितले. खानदेशच नव्हे तर, मुंबई इलाखाभर कुष्ठरोगाबद्दलची जाणीव करून देऊन, जिल्हावार कुष्ठरोग निवारण मंडळ स्थापन करून वैद्यकीय अधिकारी व कार्यकर्त्यांना प्रवृत्त केले. या रोगाबद्दलची समाजातील घृणा नाहीशी केली. 'सेवाभावी कुष्ठसेवक' म्हणून अण्णांना लोक, अधिकारी संबोधू लागले.

ग्रामसेवा, ग्रामसुधारणा कार्यात महात्मा गांधींच्या प्रेरणेने अण्णांनी जनतेशी संपर्क ठेवून कष्टकऱ्यांच्या जीवनातील समस्या सोडविण्याचा प्रयतक केला. आरोग्य, आर्थिक स्थिती, संघटना, मनोरंजन या माध्यमाने ग्रामीण जीवनात चैतन्य निर्माण करण्यासाठी त्यांची धडपड राहिली. अनेक सेवाभावी सहकारी आपल्या सेवा कार्यात बरोबर घेऊन अण्णांनी समाज जीवनातील दुःखे दूर करण्याचा प्रयतक केला. म. गांधी, विनोबाजी भावे यांच्या प्रेरणा आणि आशीर्वादाने त्यांनी लोकोन्नतीसाठी झोकून दिले. अनेक मान्यवरांचा सहवास त्यांना लाभला.

### पूर्व खानदेशचे कर्मवीर अर्थात श्री. सेनू नारायण मेढे गुरुजी

कर्मवीर सेनू नारायण मेढे ऊर्फ मेढे गुरूजी या सेवाभावी दलित शिक्षकाने पूर्व खानदेशात दलित समाजात जागृती घडवून आणून त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आयुष्य वेचले. सामाजिक समतेच्या लढ्यात त्यांचे योगदान मोठे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढाकाराने नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय बहिष्कृत समाजाच्या पहिल्या परिषदेस श्री. मेढे गुरुजी उपस्थित राहिले. मधील छत्रपती शाहूंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेस 'डिप्रेस्ड क्लास मिशन'च्या कार्यकर्त्यांसमवेत उपस्थित मेढे गुरुजींनी दलित समाजाच्या कल्याणासाठी शिक्षणविषयक ठराव मांडले. दलित वर्गातील विद्यार्थ्यांसाठी सरकारने सवलती द्याव्यात. बहिष्कृत वर्गाने मद्य-मांस सेवन न करता, स्वच्छता आणि आरोग्याची काळजी घ्यावी यासाठी श्री. मेढे गुरुजींनी विविध बैठकांतून आपली भूमिका मांडली. पुणे येथील 'डिप्रेस्ड क्लास मिशन' या संस्थेच्या जाहीर सभेतील भाषणात 'दगडाला वाचा फुटली, महार मांग बोलू लागले' असे विचार मांडल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी श्री. मेढे यांना भेटण्याची इच्छा राजर्षी शाहू महाराजांकडे व्यक्त केली. यावेळी डॉ. आंबेडकर लंडनमध्ये होते. हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांन पूर्व खानदेशातील असोदे येथे काही दिवस श्री. मेढे आणि श्री. बिऱ्हाडे गुरुजी यांच्या सहवासात घालविले.

१ जानेवारी १९२५ रोजी जळगाव येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी संत चोखामेळा वसतिगृहाची योजना आखली. अस्पृश्यांना मिळत असलेली वागणूक कुत्री, मांजर, गाढवं यांच्यापेक्षाही हिनप्रतीची असून, माणुसकीचा अनुभव घेण्यासाठी आपण साक्षर झाले पाहिजे' असे श्री. मेढे गुरुजी आवर्जून सांगत.

अस्पृश्य शिक्षकांनी दरमहा पगारातून रुपयामागे ६ पैसे वसतीगृहासाठी द्यावेत असे आवाहन करून त्यांनी पैसा जमविला. जळगाव म्युनिसिपालिटीत सभासद म्हणून निवडून आल्यावरही त्यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी आपली धडपड सुरूच ठेवली. दलित विद्यार्थ्यांना प्राथमिक, दुय्यम शिक्षण दिले पाहिजे यासंबंधीचा पाठपुरावा केला. वसतीगृह चालवितांना असंख्य अडचणींचा सामना त्यांना करावा लागला. हरिजन सेवक संघाच्या कार्यकर्त्यांशी त्यांचा संबंध आला. सवर्ण हिंदुंचे आणि हरिजन व्यक्तींचे एक कार्यकारी मंडळ हे वसतिगृह चालवीत असे. दलित समाजातील विवाह, शोकसभा अशाप्रसंगी श्री. मेढे गुरुजी दानशूर लोकांकडून मदत मागून दलित विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पूरवित असत. असोदे येथील आपल्या वास्तव्यात त्यांनी श्री. बिऱ्हाडे गुरुजींच्या मदतीने दलित समाजाच्या उन्नतीचे कार्य सुरूच ठेवले. असोदे येथील यांच्या कार्यामुळे डॉ. आंबेडकर फारच प्रभावित झाले. महंत देविदास बुवा सोनवणेंसारखे सेवाभावी संतांचाही सहवास त्यांना लाभला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित वर्गाच्या उद्धाराच्या कार्याची सुरूवात होण्यापूर्वीच खानदेशात श्री. मेढे गुरुजींनी अस्पृश्यांच्या उन्नतीची चळवळ सुरू केली. ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. समाज जागृती व समाज सुधारणेच्या या कार्यासाठी त्यांनी गावोगावी सभा, बैठका, संमेलने व परिषदांतून अस्पृश्यांच्या दयनीय परिस्थितीचे वर्णन करून, सुधारणावादी भूमिका मांडली. पूर्व खानदेशातील बहाळ येथील शिक्षण उन्नतीसाठी बहिष्कृतांची परिषद भरली असतांना श्री. मेढे गुरुजींनी चोखामेळा वसतिगृहासाठी मदतीचे आवाहन करून अस्पृश्यांकडून उपाशीपोटी कामे न करून घेता, त्यांना माणुसकीने वागवावे असे ठरावही मंजूर करून घेतलेत. या वसतिगृहासाठी कलेक्टर आदी अधिकाऱ्यांचीही मदत घेतली. जळगाव नगरपालिकेने या वसतिगृहासाठी जमीनही दिली.

पूर्व खानदेशात जळगाव येथे आयोजित वर्णाश्रम-धर्म-स्वराज्य संघाची परिषद २९ ते ३१ डिसेंबर १९३१ दरम्यान आयोजित करण्यात आली असतांना, महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंच्या मार्गदर्शनाखाली श्री. मेढे गुरुजी आणि सहकाऱ्यांनी सत्याग्रह करून या परिषदेत अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी आग्रह धरला. श्री.मेढे गुरुजींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या प्रभावातून दलित समाजाच्या जागृतीचे कार्य केले. 'तरुण बहिष्कृत' आणि 'सेवक' या नावाची वृत्तपत्रे ही त्यांनी समाज जागृतीसाठी सुरू केली. महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह आणि बाबासाहेबांच्या समाज परिवर्तनाच्या कार्यात नेहमीच त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. दलित समाजाच्या शैक्षणिक उद्धारासाठी श्री. मेढे गुरुजी आयुष्यभर झटत राहिले.

**क्रमशः**

---

# आयकर कायदा २०२५ अंतर्गत रोख व्यवहार मर्यादा



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

**अर्थवेध**

भारतीय अर्थव्यवस्थेत, रोखीच्या व्यवहारांनी नेहमीच मोठी भूमिका बजावली आहे परंतु असे व्यवहार काळा पैसा निर्माण होण्यासाठी आणि बेहिशेबी मालमत्ता साठवण्यासाठी मोठे कारण ठरतात. रोखीचे व्यवहार करणे जितके सोपे असते, तितकीच अशा व्यवहाराच्या नोंदी आणि पडताळणी करणे कठीण असते. रोख व्यवहारांची नोंद ठेवणे अवघड असल्यामुळे कर चोरी आणि काळ्या पैशाच्या समस्यांना वाव मिळतो. त्यामुळे, सरकारने आयकर कायदा २०२५ अंतर्गत रोख व्यवहारांवर विविध मर्यादा आणि निर्बंध घातले आहेत. रोखीचे व्यवहार कमी व्हावेत यासाठी अनेक निर्बंध आणले गेले. जेणेकरून इतर साधनांचा उपयोग करून करदाता दंडापासून सुटका करून घेऊ शकतो. रोखीच्या व्यवहारांना पर्याय म्हणून अनेक नवीन साधने उपलब्ध आहेत. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (युपीआय) संलग्न देयक प्रणाली, नेट बँकिंग, क्रेडिट-डेबिट कार्ड यांसारख्या माध्यमातून भ्रमणध्वनी, लॅपटॉप किंवा संगणकाद्वारे सहज आणि त्वरित पैसे देता-घेता येतात. या द्वारे केलेले व्यवहार बँकिंग माध्यमातून होत असल्यामुळे अशा व्यवहारांची पडताळणी करणे सोपे जाते.

भारतीय आयकर कायद्याच्या तरतुदींनुसार, रोख व्यवहारांसाठी विशिष्ट नियम लागू आहेत, विशेषतः मोठ्या रकमेचे रोख व्यवहार आयकर विभागाच्या नजरेत असतात. त्यामुळे आयकर विभाग अशा व्यवहारांवर लक्ष ठेवतो आणि त्यासाठी काही मर्यादा निश्चित केल्या आहेत. जर एखाद्या व्यक्तीचे रोख व्यवहार या मर्यादेपेक्षा जास्त आढळले, तर त्याबाबत स्पष्टीकरण द्यावे लागू शकते. योग्य माहिती न दिल्यास दंड किंवा इतर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

आयकर कायद्यानुसार रोख व्यवहारांसाठी असलेल्या मर्यादा

**१) रोख रक्कम स्वीकारण्याची मर्यादा (कलम १८६) :-** करचुकवेगिरीला आळा घालणे या उद्देशाने आयकर कायद्यात कलम १८६ लागू केले गेले आहे. कोणीही एकाच दिवशी एका व्यक्तीकडून दोन लाखापेक्षा जास्त रोख स्वीकारू शकत नाही. कलम १८६ लागू करण्यामागील विधायक हेतू भारताला डिजिटल अर्थव्यवस्थेकडे नेणे हा आहे. कलम १८६ मधील कोणत्याही तरतुदी किंवा नियमांचे उल्लंघन करून रक्कम मिळाली, तर रोख स्वरूपात मिळालेल्या एकूण रकमेइतका दंड भरण्यासाठी त्यांना जबाबदार धरले जाईल.

**अपवाद-** कोणतीही बँकिंग कंपनी, पोस्ट ऑफिस, बचत बँक, सहकारी बँक, कोणतेही सरकार यांच्यासोबत केलेल्या रोख व्यवहारांसाठी कायद्याच्या कलम १८६ च्या तरतुदी लागू होणार नाहीत. त्यामुळे अशा व्यवहारांना या कलमांतर्गत अपवाद मानले जाते.

**२) कलम १८५ अंतर्गत रोख कर्ज घेणे व फेडणे मर्यादा :-** आयकर कायदा २०२५ च्या १८५ कलमानुसार कोणताही व्यक्ती वर्षभरात एक सोबत किंवा टप्प्याटप्प्याने रोख रकमेमध्ये वीस हजार (२०,०००) किंवा त्यापेक्षा जास्त दुसऱ्याकडून कर्ज स्वरूपात रक्कम स्वीकारू किंवा परतफेड करू शकत नाही. कलम १८५ चे उल्लंघन केल्यास कर्ज स्वरूपात रक्कम स्वीकारू किंवा परतफेड रकमेच्या १००% दंड आकारला जाऊ शकतो. विहित मर्यादेपेक्षा अधिक रोखीत कर्ज किंवा ठेवी स्वीकारणाऱ्या व्यक्तीला हा दंड भरावा लागतो.

**अपवाद -** कोणतीही बँकिंग कंपनी, पोस्ट ऑफिस, बचत बँक, सहकारी बँक, कोणतेही सरकार यांच्यासोबत केलेल्या रोख व्यवहारांसाठी कायद्याच्या कलम १८५ च्या तरतुदी लागू होणार नाहीत. त्यामुळे अशा व्यवहारांना या कलमांतर्गत अपवाद मानले जाते. तसेच भागीदारी फर्ममध्ये रोख भांडवलाचे योगदान देणारे भागीदार. यांच्यासोबत केलेल्या व्यवहारांसाठी कायद्याच्या कलम १८५ च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

**३) कलम ३६(४) अंतर्गत रोख व्यवसायाच्या खर्चासाठी मर्यादा :-** व्यवसायातील रोख व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आयकर कायदा, २०२५ मध्ये कलम ३६(४) ची तरतूद करण्यात आली आहे. या कलमानुसार, एखाद्या करदात्याने व्यवसाय किंवा व्यावसायिक कारणांसाठी केलेल्या खर्चाची रक्कम एका व्यक्तीस एका दिवसात १०,००० पेक्षा जास्त रोख स्वरूपात अदा केल्यास, त्या खर्चाची वजावट आयकर गणनेमध्ये मंजूर केली जाणार नाही. म्हणजेच, असा खर्च प्रत्यक्षात झाला असला तरी करपात्र उत्पन्नाची गणना करताना तो खर्च मान्य केला जाणार नाही. त्यामुळे व्यवसायिकांनी १०,००० पेक्षा जास्त रकमेचे देयक खातेधारक धनादेश, बँक ड्राफ्ट, NEFT, RTGS, UPI किंवा इतर विहित बँकिंग अथवा ऑनलाइन माध्यमांद्वारे अदा करणे आवश्यक आहे. विशेष बाब म्हणजे मालवाहतूक वाहनांच्या भाडे, भाडेपट्टा किंवा वाहतूक सेवांसाठी केलेल्या देयकांच्या बाबतीत ही मर्यादा ३५,००० इतकी आहे.

अपवाद- या नियमाला काही विशेष परिस्थितींमध्ये अपवाद देण्यात आला आहे. शेतकऱ्यांकडून थेट कृषी मालाची खरेदी, पशुपालक किंवा मत्स्यव्यवसायिकांकडून थेट खरेदी, ज्या ठिकाणी बँकिंग सुविधा उपलब्ध नाहीत, बँक सुट्टीमुळे व्यवहार करणे शक्य नसते, कायदेशीर किंवा व्यावसायिक गरजेमुळे तातडीने रोख देयक करणे आवश्यक असते किंवा सरकारने नियमांद्वारे विहित केलेल्या इतर परिस्थितीत अशा परिस्थितीत रोख देयक असूनही खर्चाची वजावट नाकारली जात नाही. याशिवाय तसेच नियमांमध्ये नमूद केलेल्या काही विशिष्ट व्यवहारांनाही सूट देण्यात आलेली आहे. तथापि, अशा अपवादांचा लाभ घेण्यासाठी करदात्याने संबंधित व्यवहाराची आवश्यकता, परिस्थिती आणि पुरावे योग्य प्रकारे जतन करणे आवश्यक आहे. त्यामुळे मोठ्या रकमेचे व्यवहार शक्यतो बँकिंग किंवा डिजिटल माध्यमांद्वारेच करणे अधिक सुरक्षित व कायदेशीरदृष्ट्या फायदेशीर ठरते.

**४) कलम १३३(५) नुसार रोख देणगी देण्याची मर्यादा :-** आयकर कायदा, २०२५ मधील कलम १३३(५) नुसार, करदात्याने पात्र ट्रस्ट, किंवा धर्मादाय संस्थांना दिलेल्या देणगीवर कर वजावटीचा लाभ घेण्यासाठी देणगीची रक्कम निर्धारित पद्धतीने अदा करणे आवश्यक आहे. जर देणगीची रक्कम २,००० पेक्षा जास्त असेल आणि ती रोख स्वरूपात अदा करण्यात आली असेल, तर त्या देणगीवर कोणतीही कर वजावट उपलब्ध होणार नाही. त्यामुळे २,००० पेक्षा जास्त रकमेच्या देणग्या धनादेश, डिमांड ड्राफ्ट, नेट बँकिंग, युपीआय, डेबिट/क्रेडिट कार्ड किंवा इतर बँकिंग माध्यमांतून अदा करणे आवश्यक आहे.




**५) कलम १२६(९) नुसार रोख आरोग्य विमा प्रीमियम वजावट :-** आयकर कायद्याच्या कलम १२६(९) नुसार, करदात्याने आरोग्य विमा पॉलिसीचा प्रीमियम रोख रकमेने भरल्यास त्या प्रीमियमवर कोणतीही कर वजावट मान्य केली जाणार नाही. या कलमांतर्गत वजावटीचा लाभ मिळविण्यासाठी प्रीमियमची रक्कम धनादेश, डिमांड ड्राफ्ट, नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड, युपीआय किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अदा करणे आवश्यक आहे. त्यामुळे आरोग्य विमा प्रीमियम भरताना रोख व्यवहार टाळून बँकिंग किंवा डिजिटल माध्यमांचा वापर केल्यास या कलमांतर्गत करसवलतीचा लाभ प्राप्त होऊ शकतो.

**६) कलम ३९३(३) नुसार बँक खात्यातून रोख रक्कम काढण्यावर टीडीएस कपात:** आयकर कायद्यानुसार कोणत्याही बँकेच्या खात्यातून रोख रक्कम काढल्यास जर त्या व्यक्तीने मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न भरलेले नसतील तर २० लाखापेक्षा जास्त रकमेवर २% (टीडीएस) कपात केली जाईल आणि जर एक करोड च्या पेक्षा जास्त रोख रक्कम काढली तर ५% (टीडीएस) कपात केली जाईल परंतु जर त्या व्यक्तीने मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न भरलेले असतील तर १ करोड पेक्षा जास्त रक्कम काढल्यास २% (टीडीएस) कापला जाईल. कलम ३९३(३) च्या अंमलबजावणीमुळे रोख व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे सोपे झाले आहे आणि डिजिटल व्यवहारांना अधिक चालना मिळत आहे.

प्रत्येक करदात्याने रोख व्यवहारांशी संबंधित नियमांची माहिती ठेवून त्यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. व्यवसाय, व्यावसायिक व्यवहार, देणग्या, कर्ज-ठेवी, आरोग्य विमा प्रीमियम किंवा इतर आर्थिक व्यवहार करताना शक्यतो बँकिंग अथवा डिजिटल माध्यमांचा वापर केल्यास केवळ कायदेशीर अडचणी टाळता येत नाहीत, तर करसवलतींचा लाभही सुरक्षित राहतो. याशिवाय, बँकिंग प्रणालीद्वारे होणाऱ्या व्यवहारांमुळे शासनाला करदात्यांच्या आर्थिक व्यवहारांची योग्य माहिती उपलब्ध होते.

---

# चैतन्य चिन्मयची शाळा-सफर




चैतन्य आणि चिन्मय घरातील हे दोन गोजिरे पक्षी यंदा तीन वर्षांचे झाले. वयाने छोटे असले तरी खोड्यांच्या बाबतीत मात्र हे दोघे अगदी विजेच्या ठिणग्याच!

घरभर त्यांच्या पावलांचा गोंगाट म्हणजे सुखाची चाहूल असायची. कधी हॉलमधून बेडरूमपर्यंत पळापळ, कधी खेळण्यांवरून छोटंसं भांडण, कधी अचानक एकमेकांना मिठी मारून हसणं, तर कधी बोबड्या बोलांतून अख्खं घर डोक्यावर घेणं!

सकाळी उठल्यापासून त्यांची शर्यत सुरू व्हायची.

आजोबा, हा माझा बॉल! नाही... माझा! आजी, हा मला ढकलतोय!

हा आधी हसला!

त्यांच्या या छोट्या तक्रारी ऐकताना घरातल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हसू यायचंच. आता दोघं थोडे मोठे झाले म्हणून त्यांना नर्सरीत पाठवायचं ठरलं. माझ्या एका जिवलग मित्राने नुकतीच एक नवी शाळा सुरू केली होती. शाळा अजून अगदी नवीन होती. रंगाचा वासही पूर्ण गेला नव्हता. छोट्या छोट्या खुर्च्या, रंगीत भिंती, कार्टूनची चित्रं आणि एका कोपऱ्यात खेळण्यांचा ढीग.

मित्र म्हणाला,

तुझे नातू आले की माझी शाळा रंगून जाईल. मी हसत म्हणालो, रंगून जाईल की उलटीपालटी होईल, ते काही सांगता येत नाही! आणि एक दिवस दोघांचं छोटंसं दप्तर पाठीवर चढलं. पहिल्या दिवशी शाळेत जाताना दोघांच्याही चेहऱ्यावर उत्सुकता होती. नवीन बूट, छोट्या पाण्याच्या बाटल्या आणि पाठीवर हलणारं दप्तर जणू एखाद्या मोठ्या मोहिमेवर निघाले होते.

वर्गात बसल्याबसल्या टीचरने गोड आवाजात शिकवायला सुरुवात केली.

“A for Apple.”

टीचरने A म्हटल्याबरोबर चैतन्यचा हात हवेत गेला.

टीचर... आमचे बाबा म्हणतात एप्पल RED असतो!

टीचरने हसू दाबत मान हलवली.

इतक्यात चिन्मयही पुढे सरकला.

कधी कधी GREEN पण असतो... बाबा म्हण-तात!

वर्गातल्या दोन-तीन मुलांनी टाळ्या पिटल्या. टीचरच्या चेहऱ्यावरचं हसू आणखी वाढलं.

पण प्रश्नांचा पाऊस थांबणारा नव्हता.

टीचर... B कुठे जातो?

एप्पल झाडावर झोपतं का? एप्पल खाली पडलं तर त्याला दुखतं का? टीचर, एप्पलला आई असते का? कधी कधी तर टीचरच काही क्षण विचारात पडायची. शिकवते मी... की हे दोघे माझीच परीक्षा घेत आहेत?

एका दिवशी टीचरने रंग शिकवायला सुरुवात केली. हा कोणता रंग? ती विचारायची.

चैतन्य पटकन म्हणायचा, हा माझ्या कारचा रंग! चिन्मय लगेच भर घालायचा, आणि हा आजीच्या साडीचा! त्यांच्यासाठी प्रत्येक गोष्ट पुस्तकातली नव्हती; ती त्यांच्या जगातली होती. शाळेतल्या छोट्या स्लाइडवरून घसरताना दोघं इतकं हसायचे की इतर मुलंही त्यांच्याकडे पाहून हसू लागायची. टिफिनची वेळ तर अजून मजेशीर असायची.

चैतन्य स्वतःचा डबा उघडून आधी चिन्मयला दाखवायचा. पहा... पोळी! चिन्मय लगेच स्वतःचा डबा पुढे करायचा. माझ्याकडे बिस्कीट! आणि मग दोघे स्वतःपेक्षा एकमेकांच्या डब्यात जास्त रस घेऊन बसायचे. पण हळूहळू लक्षात आलं की शाळेत विद्यार्थीच कमी आहेत. हे दोघे वर्गभर फळाफळा फिरत राहायचे आणि रिकाम्या बाकांमुळे त्यांचा उत्साह आणखी वाढायचा. माझा मित्र एक दिवस हसत म्हणाला, तुझे नातू दोघंच पूर्ण शाळेला पुरून उरतात!

काही महिन्यांनी त्याने शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला. मग दोघांना एका मोठ्या आणि चांगल्या चालणाऱ्या शाळेत दाखल केलं. नव्या शाळेची उंच इमारत पाहताच चैतन्यच्या डोळ्यांत चमक आली. तो अभिमानाने म्हणाला, बाबा...



हमारा स्कूल बडा है! चिन्मय त्याच्या मागेच उड्या मारत म्हणाला, हम... बडे स्कूल में जायेंगे! त्या बोबड्या बोलांचा तो गोड पाऊस अजूनही कानात घुमतो.

जुळे असल्यामुळे त्यांची स्वतःचीच एक दुनिया होती. एकाने प्रश्न विचारला की दुसरा उत्तर द्यायचा. एकाने खोडी केली की दुसरा टाळ्या पिटायचा. एक रुसला तर दुसरा त्याच्यासमोर गमतीशीर चेहरा करून हसू आणायचा.

आता त्यांना रोज शाळेत नेणं हा माझ्या दिवसाचा सगळ्यात सुंदर भाग झाला होता.

त्यांच्या छोट्या हातात हात घेतला की दिवसाची सुरुव-ातच आनंदाने व्हायची.

रस्त्यात ते अखंड बोलत राहायचे.

आज टीचर गोष्ट सांगणार! मी आज ड्रॉइंग करणार!

आजोबा, मला स्टार मिळणार!

मी फक्त ऐकत राहायचो.

कधी कधी त्यांच्या बोलण्यात हरवून मलाही माझं स्वतःचं बालपण परत सापडायचं.

आजही त्यांची ती छोटी दप्तरं, शाळेत जाण्याची लगबग आणि बोबडी भाषा आठवली की चेहऱ्यावर नकळत हसू उमटतं.

मुलांना केवळ शिक्षण नव्हे, तर प्रेम, वेळ आणि संस्कारांचीही गरज असते. त्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्या, त्यांच्या खोड्यांमध्ये सहभागी व्हा आणि त्यांचे बालपण मनापासून जगू द्या. कारण आजच्या या निरागस आठवणीच उद्याच्या सुंदर व्यक्तिमत्त्वाचा पाया घडवत असतात.

चैतन्य आणि चिन्मय हे फक्त माझे नातू नाहीत; ते माझ्या आयुष्यात आलेले दोन खोडकर धूमकेतू आहेत...

ते जिथे जातात, तिथे हशा पेरतात, आनंदाची फुले उमलवतात आणि आठवणींच्या आकाशात कायमची चमक सोडून जातात.

# शब्दझुला

## अल निनो

किती म स्ती मानवास!
निसर्ग छळ दिन रात!
संतुलन साधण्यास
अल निनो अनाहुत!
अल्निनो अडविण्याची
आहे औकात कोणात?
निसर्ग बापाचा बाप!
केव्हा येईल ध्या ना त?
पूर्व ग्लो ब ल वॉर्मिंग
युद्धाची मस्ती त्यात!
'अलनिनो' च्या रुपात
निसर्ग घा ल तो लाथ!
वृक्ष नाही संवर्धत
वृक्ष तोड तीभन्नाट!
स्वकवच कुंडले दिली
त्या अल्निनोस दानात!
नको करु तू मानसा
स्व हस्ते च आत्मघात
निसर्गधर्म ध्यानी घे
वाग तुझ्या औकातीत

– गुलाबराव मोरे, धुळे
मो.९४०४१९०४३२

## पाणी संवर्धन

पाणी वाचवणे आज ही
काळाची गरज आहे
निसर्गाची ही अमूल्य देणगी,
जपून वापरणेच समज आहे.
गच्चीवरच्या पावसाला,
पाईपद्वारे वळवू,
गाळण करून पाणी सारे,
विहिरीत खाली पाठवू.
वाळू-खडीचे थर लावून,
फिल्टर छान बनवू,
पाण्याला शुद्ध करून,
भूगर्भात ते साठवू.
वॉशिंग मशीन, पाण्याचे,
पुन्हा वापराची सवय हवी.
चे ते पाणी जणू,
झाडांसाठी एक वरदानच नवी!
रक्षण करणे कामच आमचे
नद्या, नाले,विहिरी आणि तळे,
स्वच्छ ठेवू कर्तव्य आमचे
जिवंत ठेवू पाण्याचे मळे.
स्वयंपाकघरातील पाण्याचा
वापर झाडांसाठी करा.
सांडपाण्यावर प्रक्रिया करून
त्याचा पुनर्वापर शिका.
रीड्यूस, रीयूज आणि
रीसायकल
हा तीन आर चा सुंदर मंत्र
वापरला तर किती छान
जीवरक्षक होईल हा तंत्र
नसे ही केवळ कृती आता,
हा यज्ञाचा भाव आहे,
पाणी वाचवा,जीव वाचवा,
हाच खरा बचाव आहे!

– प्रशांत सहस्रबुद्धे
८७७९२९८१६१



## मृदगंध पसरला...

पहिला पाऊस आला वादळ,
वारा,गडगडाटासह..
धांदल उडाली साऱ्यांची
धुळीची भवरी बने
पाचोळ्यासह....
झाडे उनमळती, पत्रे उडाले
असेल ते वादळात सापडते...
लाईट जाती, उकाड्याने हैराण
पावसाच्या धारांनी पृथ्वी
तरारते....
लागे मृग नक्षत्राची चाहूल
सुटला सोसाट्याचा वारा...
सारी सृष्टी सुखावली
बरसल्या झरझर मृगधारा...
तप्त धरेवर धारा बरसताच
धरतीतून मृदगंध दरवळतो..
ओल्या मातीच्या सुगंधासारखे
सुगंधी अत्तर फक्त देवच
बनवतो....
हर्ष होई मनाला पडता
पहिल्या पावसाच्या मृगसरी...
चराचरात चैतन्य पसरे
झेले सृष्टी अमृता सरी...

– विजया भट, धुळे.

## प्राण कंठाशी रे आला

तुझ्या वाचून मेघा रे
बघ झाल्या अवकळा
किती काळ सोसाव्या रे
धराईने उष्ण झळा धृ
आम्ही लेकरे तियेची
गाणे तुझे गातो गळा
पाण्या वाचून कसे ही
गाणे खुलावे रे गळा
वृक्ष वेली करपल्या
झाला पुरता पाचोळा
आधी शिशिराने केला
आता तुझाविणा झाला
तुझे गाणे गाण्यासाठी
खुलवावी शब्दकळा
नाही ओल ही घशाला
कसा स्वर व्हावा ओला
तरी शब्दझुल्यावर
गीत घेते हे हिंदोळा
नाही गुंज नाही मासा
तरी शब्द एक तोळा
तुझ्यासाठी मेघराजा
स्वर सोनियाचा झाला
वाट पाहते धराई
प्राण कंठाशी रे आला

– मंगला रोकडे, जळगांव
मो. ९३७१९०२३०३



## ये पर्जन्या.....

गरजत बरसत रिमझीम
रिमझीम ये पर्जन्या राजा
वाऱ्यावरती स्वार होऊनी
चिंबचिंब भिजवाया
वाट पाहुनी त्रस्त
जाहलेल्या या वसुंधरेला
कृष्णधवल मेघातुनी
ये रे सर सर सर भेटाया !!
नांगरणी करुन शेतकरी वाट
तुझी हा पाही
मातीची ढेकळी मोकळी
होण्या आसुसली पहा ही
चातकावानी काळी
आई तुझीच वाट पाही
झर झर बरसुनी ये तू तिजला
शीतल शांत कराया !!
कुरणावरती गुरांसाठी हरीत
तृण रे नाही
निर्झर,सरिता,विहिरींना
पाण्याचा थेंब नाही
दाही दिशांना पाणी
पाणी एकच हाक येई
सजीव सृष्टीला जीवन
देण्या येई तू सत्वरी !!
मृगनक्षत्री बरसता तू
साऱ्यांना हर्ष होई
पेरणीसाठी शेतकरी
राजा ही सज्ज होई
पाण्यावाचूनी पिके बिचारी
उन्हात रे करपती
जीवन देऊनी पोषण
करण्या येई तू झडकरी !!
धरणीपोटी बिजांकुरे
पहा जन्म रे घेती
सृष्टीवर झुलण्या पिकांना
आस लागे पाण्याची
रिमझीम, रपरप, सपसप ये
ऐकुनी हाक त्यांची
अवनीवरी शाल पसरवण्या ये
मखमली हरित तृणाची !!

– विमल पाटकरी, धुळे
मो.-९०२८०५५९११

## ये मेघा तू

ये मेघा तू, जळा भरूनी ये,
नील आकाशा तूनधृ
वाट पाहती तुझी शेतकरी,
शेताशेतातून धरणी सुकले,
बोलावित-से
बेडूक आक्रोशून पहा मुकले,
तरु पल्लव, धरणीआसुसली
दाटून ये तू, वर्षत ये तू,
शेत भळ्यातून
निर-दा! थांबले शेत करी हे,
तुझिया वाचून, गर्जत ये तू,
वर्षत ये, रान मळ्या- तून,
पहा अंबुदा !'तडाग तटीनी
शुष्क तुझाविन,
जीवन दा तू,अमृत दा तू
येअनिला वरुन
जलचर वनचर, ध्याति
तुजला,तळा वनातून,
ये ये पयोदा,पयोधरा,
सकला दे जीवन,

– मोहनदा शहादे
मो. ९८८८१८०२८३१

# फुटबॉल –'लाल – पिवळ्या' कार्डांची रंजक गोष्ट!





सलिल सुधाकर चौधरी

इंग्लंड आणि अर्जेंटिना यांच्यातील विश्वचषक उपांत्यपूर्व (Quarter Final) सामना चालू होता. सामन्याचा रेफरी जर्मनीचा रुडॉल्फ क्रेटलिन होता. सामन्यादरम्यान त्याने अर्जेंटिनाविरुद्ध फाऊल दिला. अर्जेंटिनाचा कर्णधार अँटोनियो रॅटिन याला हा निर्णय मान्य नव्हता. तो स्पॅनिश भाषेत रेफरीवर जोरजोरात ओरडू लागला. समस्या अशी होती की रेफरीला स्पॅनिश भाषा येत नव्हती. त्याला फक्त एवढेच दिसत होते की एक खेळाडू त्याच्यावर आक्रमकपणे ओरडत आहे. त्यामुळे रेफरीने रॅटिनला मैदानाबाहेर जाण्याचा आदेश दिला. पण आता दुसरी अडचण निर्माण झाली. रॅटिनला जर्मन भाषा येत नव्हती. त्याला समजलेच नाही की त्याला मैदान सोडण्यास सांगितले गेले आहे. त्यामुळे त्याने बाहेर जाण्यास नकार दिला.

एकीकडे रेफरीला आपले म्हणणे समजावता येत नव्हते आणि दुसरीकडे खेळाडूला आदेश समजत नव्हता. वाद तब्बल आठ मिनिटे चालला. इंग्लंडचे जॅक चार्लटन आणि बॉबी चार्लटन हे खेळाडू देखील या वादात सहभागी झाले. शेवटी रॅटिनला जबरदस्तीने मैदानाबाहेर पाठवण्यात आले आणि सामना पुन्हा सुरू झाला. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांनी बातमी दिली की इंग्लंडचे जॅक चार्लटन आणि बॉबी चार्लटन या दोघांनाही रेफरीने बाहेर जायला सांगितले होते.

म्हणजेच...

रेफरी काहीतरी वेगळे समजत होता. खेळाडूंना काहीतरी वेगळे वाटत होते. आणि प्रसारमाध्यमे काहीतरी वेगळेच लिहित होती. विश्वचषकासारख्या सर्वोच्च दर्जाच्या स्पर्धेत ही परिस्थिती अत्यंत गोंधळाची होती. जेव्हा रेफरी आणि खेळाडू एकमेकांची भाषा समजत नाहीत, तेव्हा स्पष्ट संवाद कसा साधायचा? या संपूर्ण स्पर्धेतील रेफरी व्यवस्थापनाची जबाबदारी इंग्लंडचे केन ॲस्टन यांच्याकडे होती. त्यांच्या मनात सतत एकच प्रश्न होता: वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांना एकच संदेश स्पष्टपणे कसा द्यायचा?

त्याचदरम्यान एक दिवस ते गाडी चालवत होते. समोर सिग्नल दिसला. हिरवा दिवा पिवळा झाला. त्यांनी गाडीचा वेग कमी केला. थोडे पुढे गेल्यावर पिवळा दिवा लाल झाला. त्यांनी गाडी थांबवली. आणि अचानक त्यांच्या डोक्यात एक कल्पना चमकली. जगभरात कुणालाही वाहतूक सिग्नल समजतात. पिवळा म्हणजे सावध रहा. लाल म्हणजे थांबा. ही अशी भाषा होती जी कोणत्याही शब्दांशिवाय संपूर्ण जगाला समजत होती. घरी पोहोचल्यावर त्यांनी ही कल्पना पत्नीला सांगितली. त्यांच्या पत्नीने लगेच लाल आणि पिवळ्या रंगाचे दोन छोटे कार्ड तयार केले, जे शर्टच्या खिशात सहज मावतील.

आता रेफरीला काही बोलण्याची गरज नव्हती. तो फक्त कार्ड दाखवू शकत होता.

पिवळे कार्ड = इशारा

लाल कार्ड = मैदानाबाहेर

आता खेळाडू, प्रेक्षक, पत्रकार सगळ्यांनाच एका क्षणात परिस्थिती समजत होती. भाषेची गरजच उरली नाही. हा खरा संवाद होता. शब्दांशिवाय संवाद. आज जगभरातील प्रत्येक फुटबॉल सामन्यात लाल आणि पिवळ्या कार्डांचा वापर केला जातो. ही कल्पना कोणत्याही मोठ्या संशोधन संस्थेतून किंवा शेकडो तज्ञांच्या बैठकीतून आली नव्हती. ती आली होती एका साध्या माणसाच्या साध्या विचारातून. फक्त ३० सेकंदांच्या लॉजिकल विचारांमधून ! कारण केन ॲस्टन यांनी स्वतःसारखा विचार न करता, सामान्य लोकांसारखा विचार केला. आणि जेव्हा आपण ज्यांच्याशी संवाद साधत आहोत त्यांच्या दृष्टीकोनातून विचार करतो, तेव्हा आपला संदेश खरोखर प्रभावी ठरतो.

लघुउद्योजक, प्रशिक्षक, विक्रेते आणि कंटेंट क्रिएटर्स यांच्यासाठी या कथेत मोठा धडा आहे. अनेक व्यवसाय अपयशी होतात कारण त्यांचे उत्पादन वाईट असते म्हणून नाही, तर त्यांचा संदेश ग्राहकांना समजत नाही म्हणून. ग्राहकाला तुमचे फीचर्स समजत नाहीत. त्याला त्याचा फायदा समजला पाहिजे.

उदाहरणार्थ:

"AI-Powered Automation Platform" म्हणण्यापेक्षा दररोज २ तासांचे काम १० मिनिटांत करा हे जास्त प्रभावी आहे. "CRM Software" म्हणण्यापेक्षा एकही ग्राहक फॉलोअपमधून सुटणार नाही हे जास्त स्पष्ट आहे. "Financial Planning Service" म्हणण्यापेक्षा निवृत्तीनंतर पैशाची चिंता कमी करा हे अधिक समजण्यासारखे आहे. लोक तुमची भाषा समजून घेत नाहीत; ते त्यांच्या समस्यांची भाषा समजतात. केन ॲस्टन यांनी फुटबॉलसाठी लाल-पिवळ्या कार्डांचा शोध लावला. प्रत्येक उद्योजकाने आपल्या व्यवसायासाठी असेच लाल-पिवळे कार्ड शोधले पाहिजे एक असा संदेश जो एका क्षणात समजेल.

# प्रगत नाविकशास्त्र

(पान ३ वरुन) **जहाजाची गोदी-** कुलाबा शब्दाचा अर्थच मुळात गोदी असा आहे. या गोदीमधुन पाल, धुरभ, शिरव आदि. गलबते तयार होत असत.नौकांची व्यवस्था सुसज्ज करण्यासाठी गोदीमध्ये पाण्याची पातळी कायम राखण्यासाठी प्रवेश मार्गावर नियंत्रक दरवाजे बसवावे लागत.गोदीमुळे पाण्याची पातळी कायम राहते.बोटी धक्याला घासत नाहीत व वादळामुळे त्यावर परिणामही होत नाही. त्यामुळे योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून महाराजांनी आरमारी बोटीची रचना केली. छोटया पातळ पण भक्कम अशा या बोटी समुद्रातील उथळ व खोलगट पाण्यातही अचुक व वेगवान हालचाली करीत असत. किल्ले विजयदुर्ग येथे पश्चिम किणारपट्टीवरील सर्वात मोठी गोदी म्हणजेच ३५५ फूट आकाराची आरमाराची गोदी वाघोटन खाडीत बांधलेली आहे. या गोदीमध्ये नविन जहांजाची निर्मिती करून मराठा आरमाराने परकीय आरमाराचा अनेक वेळा पराभव केला.

**जहाजांचे संरक्षण-** तेल, मेण, तूप, लांबी आदि. साहित्य उत्कृष्ठ जहाज बांधणीसाठी व दुरूस्ती करण्यासाठी वापरले जात असे. जहाजाला मुलायमपणा येण्यासाठी तेलाचा उपयोग होत असे. तेल व तुप वापरामुळे समुद्राच्या पाण्यातही जहाजांचे संरक्षण होत असे,जहाज बांधणीसाठी मेणाचा वापर केल्यामुळे जहाजांना मजबुती येत असे. जहाजांच्या लाकडातील फटी व छिद्रे भरून काढण्यासाठी लांबी वापरली जात असे.

**होकायंत्रे/दिशादर्शक यंत्रे व दुर्बिणी-** नौकांना मार्गदर्शन करण्यासाठी सागरी मार्गामध्ये दीपगृहे, इशारे वजा सुचना देणारी चिन्हे व तरंगते झेंडे आदि.योजना उत्तम असे. सागरामध्ये आपली जहाजे ओळखण्यासाठी वेगवेगळ्या रंगाची निशाणे होती. दिशादर्शक यंत्रे व दुर्बिणी होत्या.युध्दसेनांनी सुसज्ज अशा युध्दनौका होत्या.स्वराज्यातील नौसेनापतीचा ही एक ध्वज होता, तो ध्वज पांढराशुभ्र होता. आजही असाच ध्वज भारतीय नौदल वापरत आहे.

छत्रपतींनी तोफा व बंदुका या सारख्या महत्त्वांच्या शस्त्रांकडे काटेकोरपणे लक्ष दिले. सागरी युध्दतंत्रात दारूगोळयाच्या शस्त्रांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त होऊन ती प्रत्येक युध्दात निर्णायक ठरली.छत्रपतींनी आरमार, जहाज बांधणी, आरमारी तळ, सागरी जलदुर्ग, आरमारी गोद्या, दर्यावर्दी सेनानी, तोफा, जंबुरे, बंदुका, दारूगोळा आदि. गोष्टी अतिशय काटेकोरपणे उभा करून सागरी प्रदेशाला भक्कमता आणली. छत्रपती शिवाजी महाराज एक उपजत योध्दे व सेनानायक असल्यामुळे त्यांनी आपल्या सैन्याचे फक्त आधुनिकीकरणच केले असे नाही तर प्रगत शस्त्रास्त्रे, आधुनिक आरमार आणि सुसज्ज तोफखानादल यांना उत्तेजन देऊन भारतीय नाविक दल सर्वश्रेष्ठ बनविले.

# फादर्स डे

***ज्यांच्या संघर्षामुळे आपले आयुष्य सुखी आहे त्या वडिलांना सलाम!***
***वडिलांच्या शाळेत मिळतो जीवनाला आधार,***
***त्यांच्या कष्टांनी उजळतो यशाचा प्रत्येक संसार,***
***शब्दात न मावणारे त्यांचे प्रेम अपार,***
***वडील म्हणजे आयुष्याचा खरा शिलेदार!***




सौ जयश्री बिर्ला.
मो: ९४०४०५६८४३

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकदा आपण वडिलांप्रती असलेले प्रेम आणि आदर व्यक्त करायला विसरतो. 'फादर्स डे' हा दिवस आपल्या वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा खास दिवस आहे. वडील हे कुटुंबाचे मुख्य आधारस्तंभ असतात. वडील हे आपल्या जीवनातील मार्गदर्शक असतात. चालायला बोलायला आणि जीवनातील चढा ओढींना सामोरे जायचे ते शिकवतात. आपल्या कुटुंबाच्या सुखासाठी वडील अहोरात्र मेहनत करतात. मेहनत करत असताना ते आपल्या चेहऱ्यावर किंवा बोलण्यातून कष्ट दाखवीत नाही. अनेकदा ते कठोरही होतात, पण मुलांचे भवितव्य उज्वल व चांगले व्हावे, हीच त्यामागे भावना असते.

आईची माया ही शितल सावली देते, तर वडिलांचे प्रेम हे उन्हाची ढाल असते. ज्यांच्या कष्टावर आपले यश उभे असते ते म्हणजे वडील. वडिलांच्या मार्गदर्शनातून यशस्वी जीवन जगण्याचे आपल्याला धडे मिळत असतात. वडिलांचे प्रेम हे निस्वार्थ असते. त्यांचा नेहमी त्याग वृत्तीभाव असतो आणि प्रत्येक संकटात कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. त्यांच्या अनुभवाने मुलांच्या आयुष्याला योग्य दिशा मिळते. ते स्वतःच्या इच्छा व दुःख बाजूला करून मुलांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. धन्य आहे ते नशीबवान, ज्यांच्या डोक्यावर वडिलांचा हात असतो. आयुष्यातील प्रत्येक संकट त्यांच्या आशीर्वादाने दूर पळतो, हजार काट्यांमध्ये फुलासारखे सांभाळणारे म्हणजे वडील होय. 'फादर्स डे' हा केवळ एक दिवस नसून वडिलांच्या अमूल्य योगदानाची आठवण करून देणारा सन्मानाचा दिवस आहे.

ज्यांच्या कष्टानी स्वप्नांना पंख मिळाले. त्यांच्यामुळेच आमच्या यशस्वी जीवनाला रंग मिळाले. अशा वडिलांना माझा मनापासून त्रिवार नमस्कार!!!



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

**मेष :** हा सप्ताह तुमच्यासाठी बऱ्याच गोष्टी एकाच वेळी घेऊन येणार आहे. त्यामुळे तुमची तारांबळ उडू शकते. तुम्हाला ओझं वाहून नेत असल्याप्रमाणे वाटू शकतं. एक प्रकारचं दडपण आणि ताण येऊ शकतो. पण हा शेवटचा टप्पा आहे हे लक्षात ठेवा! या आठवड्यात तुम्ही अनेक गोष्टी स्वतःवर ओढवून घेऊ नका, त्याचा तुम्हाला त्रास होऊ शकतो. मान, पाठ, डोकं आणि डोळे यांच्याकडे लक्ष द्या. जेव्हा तुम्हाला वाटत असेल तेव्हा मदत नक्की मागा. जगात अजून मदत करणारी चांगली माणसं आहेत यावर विश्वास ठेवा!

**वृषभः** हा सप्ताह तुमच्यासाठी इच्छापूर्तीचा असणार आहे! एखाद्या कामाचा मोबदला चांगला मिळेल. एखादी अपेक्षित घटना घडेल. एखादा लाभ नक्की होईल. मागच्या दुःखावर सुखाची फुंकर घालणारा हा काळ आहे. नातेसंबंधांमध्ये सुधारणा होईल. कलेला प्रोत्साहन मिळेल. या आठवड्यात तुमच्याकडून कळत नकळत स्वार्थी वागणूक होऊ शकते त्यामुळे ते लक्षपूर्वक टाळा. कुटुंबामध्ये एकोप्याने वागा. तुम्हाला आवडत असणाऱ्या गोष्टीसाठी वेळ काढा. कुठल्या नात्यात वितुष्ट आलं असेल तर ते दूर करण्याचा प्रामाणिक प्रयतक करा!

**मिथुनः** हा सप्ताह तुमच्यासाठी भावनांचे प्राधान्य घेऊन येत आहे. घरात किंवा नोकरीमध्ये लोकांचा प्रभाव राहील. समजून घेणारे लोक भेटतील. तुमच्या कलेला वाव मिळेल. काही प्रमाणात राजकारण घडू शकतं. कामामध्ये एक प्रकारचा टप्पा गाठला जाईल. या आठवड्यात तुम्हाला तुमचं वागणं बोलणं चांगलं आणि सुसंस्कृत ठेवण्याची गरज आहे. ऐकावं जनाचं करावं मनाचं, याप्रमाणे वागा. मोठ्यांसमोर नमतं घ्या. कोणालाही हिणवू नका. कोणा अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन मग निर्णय घ्या. तुमच्या जवळच्या व्यक्तींची चांगली काळजी घ्या!

**कर्कः** हा सप्ताह तुमच्यासाठी एका महत्त्वाच्या कलाटणीचा असणार आहे. तुमच्या मनाप्रमाणे नसलेले बदल घडतील आणि तुम्हाला शरणागती पत्करावी लागेल. अपेक्षित ध्येय गाठण्यात अजून वेळ आणि कष्ट लागतील. पण असं असूनही घाबरु नका, हे बदल सुधारणा करण्यासाठी गरजेचे आहेत. बदल हा निसर्गाचा नियम आहे हे विसरू नका! या आठवड्यात तुम्ही स्वतःचा अहंकार आणि मोठेपणा बाजूला ठेवून वागण्याची गरज आहे. आलेल्या परिस्थितीशी झगडायला जाऊ नका, शांतपणे स्वीकार करा. उद्याचा सूर्य उगवण्यासाठी आजची रात्र सरावी लागते!

**सिंहः** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक सुख समृद्धी घेऊन येत आहे. तुम्हाला एखादे लहान ध्येय गाठता येईल. एखादी हवी असलेली वस्तू घेता येईल. आर्थिक लाभ होऊ शकतो. अस्थिर परिस्थिती सुधारेल. एकंदरीत हा काळ अगदी पूर्ण नाही पण काही प्रमाणात यश देणार आहे. या आठवड्यात तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. तुमच्या आर्थिक सक्षमतेने इतरांना मदत कशी करता येईल याचा विचार करा. संकुचित वृत्ती सोडा. मन मोठे करा. सगळ्यांना सामावून घ्या. तुमच्या वर्चस्वाचा गैरवापर करू नका. अहंकारासारखा दुसरा शत्रू नाही हे लक्षात ठेवा!

**कन्याः** हा सप्ताह तुमच्यासाठी स्थैर्य आणि दिलासा घेऊन येत आहे. तुम्ही तुमच्या कामात संथ पण सबळ वाटचाल करणार आहात. काही अडथळे किंवा अडचणी येऊ शकतात पण त्यातून तुम्ही आणखी मजबूत आणि सक्षम होणार आहात. प्रवास घडू शकतात. आर्थिक गोष्टी मार्गी लागतील. पण फळ मात्र सावकाश मिळेल म्हणून संयम ठेवा! या आठवड्यात तुम्ही कामात खूप कष्ट करा. जीव ओतून प्रामाणिक प्रयतक करा. घाई न करता कोणतेही काम अधिक चांगले आणि परिपूर्ण कसे करता येईल याकडे लक्ष द्या.

**तूळः** हा सप्ताह तुमच्यासाठी थोडा विरंगुळा मिळण्याचा असणार आहे. तुम्ही पूर्वी श्रम केले आहेत, आता या आठवड्यात तुम्हाला त्याचे चांगले परिणाम बघायला मिळतील. तुम्ही आत्मपरीक्षण करू शकाल आणि काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करू शकता. तुम्ही भौतिक सुखात आरामात असाल. या आठवड्यात तुम्ही काळजी सोडून आनंद घेण्याची गरज आहे. हा वेळ स्वतः मधे सुधारणा करण्यासाठी वापरा. जरी तुमच्याकडे चांगली संपन्नता असली तरी वस्तूंचा अतिरेक वापर करू नका. गरजेपुरताच वापर करा. कसलाही दिखावेपणा करू नका!




**वृश्चिकः** हा सप्ताह तुमच्यासाठी खोळंबलेला काळ घेऊन येत आहे. गोष्टी अडकल्यासारख्या वाटतील. पटापट काही घडणार नाही. त्यामुळे तुम्हाला बेचैन वाटू शकतं. कामाच्या ठिकाणी तेच तेच काम करुन कंटाळा येण्याचा संभव आहे. मनातून उत्साह कमी राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्याकडे जे चांगलं आहे, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. जे नाही त्यामुळे स्वतःला त्रास करुन घेण्यापेक्षा आहे त्यात आनंद मानायला शिका. इतरांमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर संयम ठेवा, माणसं आणि नाती पटकन तोडायला जाऊ नका.

**धनूः** हा सप्ताह तुमच्यासाठी मिश्र स्वरूपाचा असणार आहे. तुमच्या ध्येयापर्यंत पोचाल पण तरीसुद्धा समाधान वाटणार नाही. आणखी पुढे काहीतरी करायला हवं अशी भावना येईल. भौतिक सुखसोयींपासून एक प्रकारची विरक्ती येऊ शकते. कामामध्ये विलंब होऊ शकतो. एखादं अवघड ध्येय साध्य करण्याच्या दिशेने पाऊल टाकाल! या आठवड्यात खरंच तुम्हाला नक्की काय हवं आहे, याचा नीट विचार करा आणि त्याप्रमाणे पुढे चाला. उथळ गोष्टींमध्ये अडकून राहू नका. भावनांमध्ये, भूतकाळात किंवा नैराश्यात अडकून राहू नका. उपासना किंवा मेडिटेशन करा, एकांतात वेळ घालवा.

**मकरः** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जादायक आणि प्रेरणादायक आहे. अडकलेल्या गोष्टी मार्गी लागतील. निराशेकडून नव्या उमेदीकडे घेऊन जाणारा हा काळ आहे. कामामध्ये चांगलं यश मिळू शकतं. लोकांना तुमच्या कर्तृत्वाची माहिती होईल. घरामध्ये किंवा कुटुंबामध्ये आनंदाचा प्रसंग येऊ शकतो. काही लपून राहिलेल्या गोष्टी समोर येतील. या आठवड्यात तुम्हाला सचोटी, खरेपणा आणि प्रामाणिकपणा यांच्या आधारे वागण्याची गरज आहे. पारदर्शी पध्दतीने काम करा. एखादं यश मिळालं असेल तर हुरळून जाऊ नका. अभिमान सोडून नम्रता ठेवा.

**कुंभः** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे. पुष्कळ घडामोडी पटापट घडण्याचा हा काळ असणार आहे. तुमच्या विचारसरणीला धक्का लागू शकतो. विभक्त होणे किंवा फूट पडणे किंवा मतभेद होऊन वाद होणे अशी परिस्थीती निर्माण होऊ शकते पण तुमचे संयम आणि धैर्य तुम्हाला यातून तारून नेईल! कशीही परिस्थीती आली तरी खचून न जाता, धीराने सामोरे जायचे आहे. लहानसहान भांडणे विकोपाला नेऊ नका, संयम आणि शांतता ठेवा. काही निरुपयोगी गोष्टी सोडून द्या, कचरा टाकून द्या. बदलत्या गोष्टींत सहभागी व्हा.

**मीनः** हा सप्ताह तुमच्यासाठी जलद गतीचा आहे. तुमच्या कामात तुम्हाला नवीन संकल्पना सुचतील. थोडे मतभेद आणि वादविवाद देखील संभवतात पण एकुणात परिस्थीत चांगली राहील. इतरांसमोर तुमचं बुद्धीचातुर्य उठून दिसेल. तुम्हाला हवी असलेली बातमी मिळेल, किंवा हवी असलेली व्यक्ती भेटेल. एखादा प्रवास घडेल. या आठवड्यात तुम्ही अतिशय प्रामाणिकपणा जपण्याची गरज आहे. रोखठोक वागा, भावनांना बळी पडू नका. संवाद कौशल्यात सुधारणा करा. वाचन, लेखन यासारख्या गोष्टींत मन रमवा. फक्त लहान तोंडी मोठा घास घेऊ नका!

पान १ वरुन

## पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांडाच्या आरोपातुन

अविश्वसनीय, विसंगत आणि संशयास्पद ठरवली. न्यायालयाच्या निरिक्षणानुसार, जैनला सप्टेंबर २००९ मध्ये अनधिकृतपणे ताब्यात ठेवण्यात आले होते. त्याला पंधरा दिवस बेकायदेशीररित्या डांबून ठेवून मारहाण करण्यात आल्याचा आणि दबावाखाली कबुलीजबाब घेतल्याचा उल्लेखही निकालपत्रात करण्यात आला आहे. सरकारी पक्षाने ही बाब न्यायालयापासून लपविल्यामुळे संपूर्ण तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच, जैनने केवळ पन्नास हजार रुपयांसाठी हत्या केल्याचा दावा केला होता. मात्र त्याच्याकडे मोठी मालमत्ता, व्यवसाय आणि सोन्याची संपत्ती असताना एवढ्या कमी रकमेसाठी तो अशा गंभीर कटात सहभागी झाला असावा, हा दावा न्यायालयाला विश्वासार्ह वाटला नाही. इतकेच नव्हे तर, हत्येच्या दिवशी तो मुंबईबाहेर कसा गेला याबाबत त्याने वेगवेगळ्या टप्प्यांवर चार भिन्न आणि परस्परविरोधी माहिती दिली होती. यामुळे त्याच्या संपूर्ण साक्षीवरच संशय निर्माण झाला.

**तपासातील त्रुटींवर न्यायालयाचे ताशेरे**

निकाल दरम्यान न्यायालयाने तपास यंत्रणांच्या कामकाजावरही कठोर टीका केली. या खटल्यातील एकाही आरोपीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला नव्हता किंवा त्यांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) गोळा करण्यात आले नव्हते. आरोपी परस्पर संपर्कात होते की नाही, हे सिद्ध करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले तांत्रिक पुरावेच सादर करण्यात आले नाहीत, असे न्यायालयाने नमूद केले. घटनाक्रमात अनेक दूरध्वनी संभाषणांचा उल्लेख असला, तरी पवनराजे निंबाळकर यांना आरोपींकडून थेट फोन आल्याचे कोणतेही ठोस पुरावे तपास यंत्रणांना सादर करता आले नाहीत. त्यामुळे कट सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेली पुराव्यांची साखळी अपुरी राहिल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

**जळालेल्या वाहनाबाबतही प्रश्नचिन्ह**

हत्येनंतर गुन्ह्यात वापरलेली कार जाळण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, पूर्णपणे जळून गेलेल्या वाहनाचा रंग पंचनाम्यात हिरवा असल्याचे कसे नमूद करण्यात आले, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. तपास अधिकाऱ्यांनी कागदपत्रांच्या आधारे रंगाची नोंद केल्याचे सांगितले असले तरी मुळ पुराव्यांच्या विश्वसनीयतेवर यामुळे प्रश्न निर्माण झाल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. याशिवाय घटनास्थळावरील वाहनाची स्थिती आणि प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांमध्येही तफावत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले.

**राजकीय वैमनस्य मान्य, पण पुरावे अपुरे**

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात पवनराजे निंबाळकर आणि डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यातील राजकीय संघर्ष मान्य केला. तेरणा साखर कारखान्याच्या वादांपासून निवडणुकीतील संघर्षापर्यंत दोन्ही नेत्यांमध्ये मोठे मतभेद होते. पवनराजे यांनी आपल्या जीवाला धोका असल्याचे निवेदनही प्रशासनाला दिले होते. मात्र, केवळ राजकीय वैमनस्य अस्तित्वात आहे म्हणून एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवता येत नाही. त्यासाठी ठोस, विश्वासार्ह आणि कायद्याच्या कसोटीवर टिकणारे पुरावे आवश्यक असतात, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**सर्व आठ आरोपींची निर्दोष मुक्तता**

या खटल्यात न्यायालयाने डॉ. पद्मसिंह पाटील, सतीश मंदाडे, मोहन शुक्ला, शशिकांत कुलकर्णी, कैलास यादव, दिनेश तिवारी, पिंटू सिंग आणि छोटे पांडे या सर्व आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त केले.

## सैनिक कॉलनी पंपिंग स्टेशन जलकुंभाचे लोकार्पण

प्रभाग क्र.१ मधील नगरसेवक सुभाष जगताप, ललित माळी, नगरसेविका उज्वला भोसले, योगिता कुटे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

**आरोग्य केंद्राचे लोकापर्ण**

साक्री रोड परिसरातील छत्रपती संभाजी नगर, कृष्ण नगर येथील महापालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा लोकार्पण सोहळा आ.अनुप अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी आ. अनुप अग्रवाल यांच्या समवेत आयुक्त नितीन कापडणीस, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, स्थायी समिती सभापती लताबाई सोनार, महिला बाल कल्याण सभापती उज्वला ठाकरे, उपसभापती शोभा भिल, नगरसेविका किरण कुलेवार, प्रतिभा पाटील, नगरसेवक सुनिल बैसाणे, अरूजा विरभान, गुलशन उदासी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## प्रकाशाजवळ नव्वद लाखांचा मद्यसाठा जप्त

घेतले आहे. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.ही धडाकेबाज कारवाई नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत एपीआय संदीप वाघ, एएसआय चंद्रकांत देसले, पोलीस हवालदार दीपक चौधरी, पोलीस शिपाई भगवान सावळे आणि कपिल मंदिल यांच्या पथकाने सहभाग घेतला. या मोठ्या कारवाईमुळे नंदुरबार जिल्ह्यातून गुजरातकडे होणाऱ्या अवैध दारू तस्करीला मोठा आळा बसला असून नागरिकांमधून पोलिसांचे कौतुक होत आहे.अवैध मद्य वाहतूकीसोबत या मार्गावर राज्य सरकारने प्रतिबंध घातलेल्या गुटख्याचीही वाहतूक होत असल्याची चर्चा असून पोलिसांनी याप्रकरणी कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## देवराज बडगुजर महाराष्ट्राच्या संघात

केले होते. देवराजच्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या बळावर धुळे संघाने ५ पैकी ४ सामन्यात बाजी मारली होती. दणकट शरीरयष्टी, सातत्यपूर्ण आणि अचूक वेगवान गोलंदाजी, प्रभावी स्विंग, उत्कृष्ट फिटनेस, खेळावरील बुद्धिमत्ता आणि मानसिक ताकद या गुणांमुळे देवराजने निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. अंतिम महाराष्ट्र संघात स्थान मिळविण्यासाठी तो निश्चितच दमदार कामगिरी करेल, असा विश्वास जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींनी व्यक्त केला आहे. वेग, अचूकता, स्विंग, फिटनेस, बुद्धिमत्ता, मानसिक ताकद या देवराजच्या जमेच्या बाजू आहेत. या स्तुत्य निवडीबद्दल देवराजचे धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी अभिनंदन केले.

## गणपतीपुळे समुद्रात आठ जण बुडालेत

जण सकाळी समुद्रात उतरले होते. मात्र, भरती आणि समुद्राच्या पाण्याचा योग्य अंदाज न आल्याने हे सर्वजण पाण्यात वाहून जाऊ लागले. समुद्रात पर्यटक बुडत असल्याचे लक्षात येताच स्थानिक जीवरक्षक आणि नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. पैकी तीन पर्यटकांना सुखरूपपणे समुद्राबाहेर काढण्यात यश आले आहे. तीन जणांचे प्राण वाचले आहेत. मात्र, उर्वरित पाच जण बेपत्ता आहेत. घटनास्थळी पोलीस व स्थानिक प्रशासनाचे अधिकारी दाखल झाले असून शोधमोहीम सुरू आहे. या दुर्घटनेमुळे गणपतीपुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पर्यटकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आहे. बेपत्ता असलेल्या पाचही पर्यटकांचा शोध घेण्यासाठी स्थानिक मच्छीमार, जीवरक्षक आणि प्रशासनाकडून युद्धपातळीवर शोधमोहीम राबवली जात आहे. अद्याप कोणाचाही ठावठिकाणा लागलेला नसून, शोधकार्य वेगाने सुरू आहे. या घटनेमुळे गणपतीपुळे परिसरात आणि पर्यटकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## धुळ्यात गॅस, डिझेल चोरांची टोळी

गुन्हा दाखल झाला. एलपीजी टँकरमधुन अवैधरीत्या गॅस काढुन व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरमध्ये भरुन, डिझेल टँकरमधुन अवैधरीत्या डिझेल काढुन स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता साठा करणे, मानवी जीवीतास धोका निर्माण होईल, असे कृत्य केल्याचेही दिसुन आले. पोलीस निरीक्षक दीपक वळवी, सहाय्यक उपनिरीक्षक कमल पवार तपास करीत आहेत.

# कृषी केंद्रांना खत व बियाणांचा पुरवठा करा अधिकाऱ्यांना संभाजी ब्रिगेडने दिले निवेदन

धुळे, दि.२०- शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागतीचे कामे पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. जिल्ह्यातील कृषी केंद्रांवर खत, बियाणे खरेदीसाठी रांगा लागत आहेत. जिल्ह्यातील कृषी केंद्रांना मुबलक प्रमाणात खत व बियाणांचा पुरवठा करावा. तसेच जादा दाराने खत, बियाणांची विक्री करणाऱ्या कृषी केंद्रांवर कारवाई करण्यात यावी. या मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा कृषी अधिकारी यांना दिले.

निवेदनात नमुद केले आहे की, जिल्ह्यात खत, बियाणांचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. पुरवठा कमी असल्याचा फायदा घेवून काही कृषी केंद्रांकडून अवाजवी दर आकारून खत, बियाणांची विक्री केली जात आहे. कृषी केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष भरारी पथकांची नेमणूक करून तपासण्या करण्यात याव्यात. जिल्ह्यातील सर्व कृषी बियाणे विक्रेते, दुकाने व गोदामांची विशेष तपासणी मोहिम राबविण्यात यावी. बोगस, बनावट तसेच अनधिकृत बियाणांची विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येवून कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या दोषींना अटक करून कारावासाची शिक्षा होण्यासाठी कारवाई करण्यात यावी. कृषी विभागाच्या भरारी पथकांच्या माध्यमातून ग्रामीण भागात नियमित छापे टाकण्यात यावेत. दोषी कंपनी, वितरण व विक्रेत्यांची नावे सार्वजनिक करून परवाने रद्द करण्यात यावे. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देतांना संभाजी ब्रिगेडचे हेमंत भडक, महेश पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी दिले.

पान १ वरुन

## आर.सी.पटेल शैक्षणिक संस्थेचा

हितेश सोनवणे, प्राची निंबा कोळी, नंदिनी भरतसिंग राजपूत, वीरा पंकज पाटील, दिव्या राजेंद्र पाटील, नयन्सी मॅथ्युज राजपूत, अमरिशभाई आर. पटेल सी.बी.एस.ई. स्कूल ची मृणाल विलास पाटील, आर. सी. पटेल इंग्लिश माध्यमिक विदयालय शिरपूर येथील कनिष्का निलेश पाटील यांचे उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर संघात निवड झाली असून त्यांना संस्थेतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, उपाध्यक्ष भूपेशभाई पटेल, धुळे जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, विश्वस्त अतुल भंडारी, विश्वस्त विजय भंडारी, स्पोर्ट्स चेअरमन प्रितेश पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे सचिव संजय चौधरी, जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे सदस्य दिपक पाटील, एस. व्ही. के. एम. संस्थेचे स्पोर्ट्स डायरेक्टर डॉ. किरण अंचन, डॉ. विनय पवार, जे.पी.पाटील, सहभागी शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षकांनी संघातील खेळाडूंचे कौतुक केले. या संघाला फुटबॉल प्रशिक्षक मुहम्मद शफीक, अयाज अहमद, रवींद्र ठाकूर व अशोक माने यांचे मार्गदर्शन लाभले.

## आदिवासी भागात मोहिम जोरात

आले आहे. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये ही मोहीम युद्धपातळीवर सुरू असून, यामध्ये ते वयोगटातील व्यक्तींच्या सिकलसेल स्क्रीनिंगवर (तपासणी) विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

याच मोहिमेचा भाग म्हणून आणि प्रतिवर्षी १९ जून रोजी साजरा होणाऱ्या जागतिक सिकलसेल दिनाचे औचित्य साधून आज दि. १९ जून २०२६ रोजी जिल्हा रुग्णालय, धुळे येथे भव्य सिकलसेल आजार तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावर्षी जागतिक सिकलसेल दिनानिमित्त सिकलसेल रुग्णांच्या आरोग्यातील विषमता दूर करणे या जागतिक संकल्पनेवर आधारित जनजागृती करण्यात आली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांनी उपस्थितांना सिकलसेल आजाराची लक्षणे, उपचार पद्धती आणि नियमित चाचणीचे महत्त्व याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच, जागतिक सिकलसेल दिनानिमित्त उपस्थित सिकलसेल रुग्णांना मोफत गोळ्या व औषधांचे वाटप करण्यात आले.या शिबिराचे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.रवींद्र सोनवणे, श्री.भा.हि.शा.वै.म.धुळे चे अधिष्ठाता डॉ.सयाजी भामरे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.. डॉ.सचिन बोडके यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

सिकलसेल हा एक अनुवांशिक रक्ताचा आजार आहे. योग्य वेळी चाचणी आणि नियमित उपचारांमुळे रुग्ण सामान्य जीवन जगू शकतात. भावी पिढीला या आजारापासून वाचवण्यासाठी विवाहापूर्वी सिकलसेल कुंडली (आरोग्य पत्रिका) जुळवणे अत्यंत आवश्यक आहे. असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांनी केले.

यावेळी, डॉ.महेश भडांगे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. अश्विनी भामरे वैद्यकीय अधीक्षक, स्त्री रुग्णालय, धुळे, डॉ. विवेक जाधव निवासी वैद्यकीय अधिकारी, डॉ. स्वप्निल पाटील सहाय्यक अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय अधिकारी डॉ. गीतांजली सोनवणे, डॉ. अभय शिनकर, डॉ. हेमंत चौधरी, डॉ. मोहसीन मुल्ला, डॉ.अलीम अन्सारी, डॉ.मनीषा चौधरी, डॉ. दिनेश दहिते, डॉ. म्हसणे. यांच्यासह परिचारिका व नर्सिंग स्टाफ मधील सहाय्यक अधिसेविका शोभा पवार, वंदना मोरे, बाह्य रुग्ण विभाग परिसेविका प्रतिभा घोडके, दिपाली मोरे, नर्सिंग स्कूलचे प्राचार्य भूषण जोशी. समन्वयक व समुपदेशक जिल्हा सिकलसेल व कल्याण समिती समन्वयक विलास वारुडे, सिकलसेल समुपदेशक दौलत मोरे आणि आधिपरिचारक कमलेश परदेशी या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सक्रिय सहभागाने हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला.

# हनुमान मंदिराचा मंडप कोसळला सात जण जागीच ठार, अनेक जखमी

**परभणी, दि.२०- परभणी जिल्ह्यातीलमानवततालुक्यातील कोल्हा शिवारात असलेल्या यशवाडी येथील प्रसिद्ध त्रिमूर्ती हनुमान मंदिरात शनिवार, २० रोजी सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी वर्दळ होती. दुपारी ३ वाजेच्या सुमारास मंदिरात सुरू असलेल्या सभामंडपाच्या बांधकामाचा स्लॅब अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या भीषण दुर्घटनेत भाविकांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला असून, २० ते २५ भाविक ढिगाऱ्याखाली चिरडून गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य मंदिरासमोरील गाभारा आणि सभामंडपाच्या विस्तारीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू होते. दुपारी ३ वाजेच्या सुमारास अनेक भाविक सभामंडपात दर्शनासाठी आणि महाप्रसादासाठी उपस्थित असताना, नव्याने बांधण्यात येत असलेल्या छताचा आणि पिलरचा मोठा भाग भाविकांवर पडल्याने कोणालाही सावध होण्याची संधी मिळाली नाही. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, छत कोसळताना मोठा आवाज झाला आणि सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले. भाविकांमध्ये एकच पळापळ सुरू झाली असून छताखाली आणि दगडी ढिगाऱ्याखाली अनेक लोक गाडले गेले होते. घटनास्थळावरील दृश्य अत्यंत थरकाप उडवणारे होते. दगडी बांधकामाचा भाग भाविकांवर पडल्याने अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले आणि मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

घटना घडताच परिसरात उपस्थित असलेल्या इतर भाविकांनी आणि स्थानिक ग्रामस्थांनी कसलीही वाट न पाहता तातडीने ढिगारा उपसण्याचे आणि बचावकार्य सुरू केले. घटनेचे गांभीर्य ओळखून प्रशासकीय यंत्रणा तातडीने कामाला लागली. मानवत, परभणी, सेलू आणि पाथरी येथून तात्काळ रुग्णवाहिका, अग्निशामक दलाच्या गाड्या आणि वैद्यकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. ढिगाऱ्याखालून काढण्यात आलेल्या जखमी भाविकांना तात्काळ उपचारासाठी परभणी येथील शासकीय जिल्हा रुग्णालय तसेच विविध खाजगी रुग्णालयांमध्ये हलवण्यात येत असून प्रशासनाकडून मदत व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

**होम ट्यूटर**
घरी येऊन क्लास (ट्यूशन) घेतले जाईल.
-: विषय :-
Physics, Maths, Chemistry, Biology Science
5 th to 12 th
-: संपर्क :-
प्रो.जितेंद्र निकम
9665173176
9637566046

**पाहिजे**
पारोळा रोड किंवा प्रकाश टॉकीज परिसर येथे दुकान भाड्याने पाहिजे.
7744009966

**तार कंपाऊंड**
तार कंपाऊंड तयार करुन मिळेल.
शांती सिमेंट प्रॉडक्टस, एमआयडीसी, धुळे
- संपर्क -
9422289550

**भाड्याने देणे आहे**
अग्रवाल नगर नर्सरी जवळ 1 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
9421799330

GK ARCADE Shops & Luxurious Flats
जी.के. आर्केड या रिअल इस्टेट प्रोजेक्टसाठी
**सेल्स प्रतिनिधी पाहिजेत**
नकाणे रोडवरील फ्लॅट, शॉप्स व बोरकुंड व आर्वी येथील प्लॉटींग ले-आऊट च्या विक्रीसाठी आम्हाला कष्टाळू आणि महत्त्वाकांक्षी सेल्स प्रतिनिधींची गरज आहे.
प्रॉपर्टी ब्रोकर्स आमंत्रित
आकर्षक कमिशन मिळवण्याची सुवर्णसंधी!
रिअल इस्टेट क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी...
पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर, ग्राहकांशी उत्तम संवाद साधण्याची कला अवगत असावी. रिअल इस्टेट किंवा कोणत्याही मार्केटिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य, स्वतःची दुचाकी असणे आवश्यक.
आजच संपर्क साधा! जी.के.आर्केड संपर्क : 88881 92677 94227 92677

**पाहिजेत**
CA (Chartered Accountant) Office कामासाठी FEMALE STAFF पाहिजे
• Education and Skills:
B. Com, CA PURSUING
Tally Prime, GST, Income Tax Knowledge,
English Knowledge
(Freshers Can Also Apply)
• Job Description:
Accounting, Auditing, GST, Income Tax, TDS, Professional Tax Return Filling and other office working
पगार – ₹15,000 ते ₹25,000 /-
Dharam M. Shah & Associates
Malegaon Road, Near Ganapati Palace, Dhule – 424001
Mobile : 8329978795 | Email: cadharamshah2@gmail.com

**पाहिजेत**
All Raunder Pharmaciest Require
9823833108

**जागा भाड्याने देणे आहे**
खोलगल्ली कस्तुरबा गांधी रोड कमल पुस्तकालय समोरील पहिला मजला सर्व सोयींनी युक्त ६२५ स्क्वेयर फुट जागा ऑफिस, डॉक्टर, लॅब यांना भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
9822357707

**प्लॉट विकणे आहे**
दिलीप दुध डेअरी समोर आर्वी मौजे ता.धुळे गट नं.२६५/३-६ हायवे टच प्लॉट विकणे आहे. प्लॉट नं.१,२,३,४, ५,६,७,८, सर्व प्लॉट ३७६२ स्केअर फुट आहे. ५०X७५ साईज आहे. सर्व प्लॉट हायवे सर्विस रोडटच आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**जागा विकणे आहे**
नविन सुरत, नागपूर बायपास वर (वडजाई) गट नं.१६९ बिनशेती झालेली २५० फुट हायवे सर्विस रोडटच आणि एक साईड वडजाई रोड टच जमीन विकणे आहे. जागा २३ R आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**प्लॉट विकणे आहे**
हॉटेल ५५५५ समोर मोहाडी गट नं. ४९ प्लॉट नं.१०७ आणि १०९ १९०० + १९०० स्केअर फुटचे प्लॉट विकणे आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**जागा विकणे आहे**
मोघण ता.धुळे आर्वी - शिरुड रोडटच गट नं.५३/१ अ ६० आर जमीन बिनशेती झालेली २०० फुटचावर फरंन्ट असलेली जमीन विकणे आहे.
एस.एम. प्रापर्टीज
9309881272

**भाड्याने देणे आहे**
डोंगरे महाराज नगर कानुश्री पहिला मजला, Solar सहीत, २४ तास पाणी, भाडण्याने देणे आहे.
: संपर्क :
9822545666

**नविन शोरुम भाड्याने देणे आहे**
टु व्हिलर शोरुम, म्युच्युल फंड, शासकीय-निमशासकीय इ.ऑफिस ट्रान्सपोर्ट कं.+ गोडाऊन फायनौन्स कं. तयार शोरुम. फर्निचर + एसी सर्व सोयीयुक्त १८X४० ऑफिस १५X३६ गोडाऊन २००० शेड वॉल कम्पाऊंड ५३०० स्केअर फुट जागा भाड्याने देणे आहे.
भेटण्याची वेळ संध्या - ५ ते ८ वाजता
हायवेटच जलगाव रोड, १०० फुटी रोड कॉर्नर, पटेल सर्विस स्टेशन के बाजुमें, धुळे
एस.एम. प्रापर्टीज - 9309881272

**पाहिजेत**
रेडीमेड कापड दुकानासाठी (अनुभवी व शिकाऊ)
सेल्समन – २ जागा
हेल्पर – १ जागा
रॉयल मेन्स वेअर
१३०६-ब, आदर्श पुस्तकालयाजवळ आग्रा रोड, धुळे
9423916107

**(गाळा) जागा विकणे आहे**
अनिल प्रिंटींग प्रेस
सत्यम आर्किड
नगरपट्टी, धुळे.
-: संपर्क :-
सोनल जोशी
9823360185

**पाहिजेत**
लॉज कामासाठी पाहिजेत.
मॅनेजर(अनुभवी)-१
रूम बॉय – ३
वॉचमन – १
पत्ता- महाले रिजेन्सी आग्रा रोड, धुळे
8551049444

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी व मेन्स वेअरसाठी सेल्समन पाहिजे.
- संपर्क -
8888294987

**पाहिजेत**
सेल्समन/ सेल्सगर्ल्स पाहिजे. कापड दुकानासाठी व लेडीज वेअर दुकानासाठी.
- संपर्क -
7066562228

**पाहिजेत**
स्वर्ण पॅलेस
आग्रा रोड, धुळे
हेल्पर – पुरुष २
फोन –
02562-233991
232428

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic Godrej



2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
श्री महावीर इलेक्ट्रीक अँड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०